ebook

॥ दासबोधातील कॉर्पोरेट मंत्र ॥

डॉ. वीरेंद्र ताटके

समर्थ रामदास स्वामींचे विचार, आजच्या कॉर्पोरेट जगासाठी !



परंपरा
प्रेरणा
प्रगती

- नेतृत्व आणि निर्णयक्षमता
- ध्येय, शिस्त व कार्यसंस्कृती
- संवाद, संघटन आणि व्यवस्थापन

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

दासबोधातील कॉर्पोरेट मंत्र

परंपरा, प्रेरणा, प्रगती

डॉ. वीरेंद्र वसंत ताटके

दासबोधातील कॉर्पोरेट मंत्र

लेखक : डॉ. वीरेंद्र वसंत ताटके

पत्ता : A - १०५ , वनाज सोसायटी , पौड रोड ,
कोथरूड , पुणे , ४११०३८

मोबाईल क्रमंक ९२२५५११६७४ ,

ईमेल आयडी tatakevv@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २९ सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५१/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- . वीरेंद्र ताटके – नंबर ९२२५५११६७४

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

<u>लेखक — परिचय</u>

डॉ. वीरेंद्र वसंत ताटके

(M.Com., MBA, FCMA, Ph.D., CIPFA–London)

डॉ. ताटके हे कॉर्पोरेट तसेच शिक्षण क्षेत्रातील वित्त, लेखा आणि कॉस्टिंग विषयातील अनुभवी तज्ज्ञ आहेत. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी वित्त व कॉस्टिंग क्षेत्रात विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या आहेत.

ते **The Institute of Cost Accountants of India**चे फेलो सदस्य असून त्यांनी वित्त विषयात पीएच.डी. संपादन केली आहे. गुंतवणूक आणि आर्थिक नियोजनासंबंधी विषयांवर त्यांची दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या माध्यमातून त्यांनी गुंतवणूकविषयक विविध कार्यक्रम

सादर करून आर्थिक साक्षरतेच्या प्रसारात योगदान दिले आहे.

प्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांच्या असा मी असामी या साहित्यकृतीवर आधारित 'पुन्हा एकदा असा मी असामी , हे त्यांचे वर्ष २०२२ मध्ये 'ई-साहित्य'वर प्रकाशित झालेले ई-बुक पुरस्कारप्राप्त ठरले आहे.

समर्थ रामदास स्वामी हे डॉ. ताटके यांच्या श्रद्धेचे आणि चिंतनाचे विशेष स्थान आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते पवित्र तीर्थक्षेत्र सज्जनगडाशी आत्मीयतेने जोडलेले आहेत. सज्जनगडावरील समर्थ सेवा मंडळाच्या 'सज्जनगड' या मासिकातून ते सातत्याने लेखन करीत असून या पुस्तकातील काही लेख यापूर्वी त्या मासिकात प्रसिद्ध झाले आहेत.

जय जय रघुवीर समर्थ!

अर्पणपत्रिका:

"हे पुस्तक ... समर्पित."

प्रस्तावना

या पुस्तकातील प्रत्येक विचाराची प्रेरणा समर्थ रामदास स्वामींच्या वाङ्मयातून घेतली असून, आधुनिक काळाच्या संदर्भात त्याचे व्यावहारिक स्वरूप मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आजचे युग हे कौशल्य, नवकल्पना आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे युग आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, व्यवस्थापक आणि उद्योजक यांनी काळानुसार स्वतःमध्ये बदल घडवून आणणे ही काळाची गरज बनली आहे. या बदलासाठी समर्थांचे विचार आणि मार्गदर्शन अत्यंत उपयोगी पडेल असे आहे.

'कॉर्पोरेट क्षेत्रात समर्थ विचार' या प्रकरणातून आधुनिक उद्योगविश्वात समर्थ रामदास स्वामींचे मार्गदर्शन आणि विचार कसे आजही लागू पडतात हे स्पष्ट केल आहे. **'व्यक्तिमत्त्व विकासासाठी समर्थ विचार'** हे प्रकरण सांगते की श्रीमत दासबोधात सांगितलेली वचने आत्मसात करून आपण आधुकीन जगात देखील आत्मविश्वास, शिस्त, सकारात्मकता याच्या मदतीने सातत्यपूर्ण प्रगतीचा मार्ग कसा निवडू शकतो हे सांगितले आहे. **'प्रभावी संभाषण कौशल्यासाठी समर्थ विचार'** या लेखातून संवाद हे यशाचे प्रभावी साधन कसे ठरते, याची चर्चा केली आहे. **'समर्थ आणि स्मार्ट'** हा लेख स्वतःच्या क्षमतांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यास प्रवृत्त करतो, तर **'मला एकटे**

सोडा!' हा विषय मानसिक आरोग्य, वैयक्तिक अवकाश आणि भावनिक संतुलन यांचे महत्त्व अधोरेखित करतो. **'समर्थ माणसं, समर्थ संस्था'** हे प्रकरण व्यक्ती आणि संस्था यांच्या सातत्यपूर्ण शिक्षणाच्या संस्कृतीवर भर देते. या प्रत्येक विषयामागे समर्थ रामदास स्वामींच्या वाङ्मयातील जीवनदृष्टी आणि समर्थ विचारांचा पाया आहे.

पुस्तकाचा पुढील भाग आधुनिक शिक्षण आणि व्यवस्थापन क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या संकल्पनांवर आधारित आहे. **'समर्थ शिक्षक – काळाची गरज'** या प्रकरणात ज्ञानदाता नव्हे तर प्रेरणादायी मार्गदर्शक म्हणून शिक्षकाची भूमिका स्पष्ट केली आहे**. मॅस्लो थेअरी** मानवी गरजा आणि प्रेरणा समजून घेण्यासाठी उपयुक्त चौकट देते. **कॉनफ्लिक्ट मॅनेजमेंट** कार्यस्थळावरील मतभेद सकारात्मकरीत्या हाताळण्याचे तंत्र शिकवते, तर **जॉब शॅडोइंग** अनुभवाधारित शिक्षणाची प्रभावी पद्धत म्हणून समोर येते. **वर्क-लाईफ बॅलन्स** वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यात समतोल राखण्याचे महत्त्व अधोरेखित करते. ह्युमन रिसोर्स ॲसेट या प्रकरणातून माणूस ही संस्थेची सर्वात मोठी संपत्ती असल्याचा विचार मांडला आहे. शेवटी,**'समर्थ गुंतवणूक सल्लागार'** या विषयाद्वारे आर्थिक नियोजन, जबाबदार गुंतवणूक आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेचे महत्त्व स्पष्ट केले आहे. या सर्व आधुनिक संकल्पनांचे विवेचन करताना समर्थ रामदास स्वामींच्या वाङ्मयातील तत्त्वज्ञानाशी त्यांचा संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या पुस्तकातील प्रत्येक प्रकरण स्वतंत्र असले तरी त्यांना जोडणारा समान धागा म्हणजे "समर्थ विचार, समर्थ कृती आणि समर्थ जीवन" हा आहे. हा धागा समर्थ रामदास स्वामींच्या वाङ्मयातूनच प्रेरित झाला आहे. पुस्तकातील काही लेख पूर्वी समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांच्या "सज्जनगड" या मासिकामध्ये प्रकाशित झाले होते. त्या लेखांना वाचकांचा लाभलेला उत्तम प्रतिसाद आणि त्यातून मिळालेल्या सूचना यांमुळे हे पुस्तक अधिक चांगल्या स्वरूपात साकार करण्याची प्रेरणा मिळाली.

हे पुस्तक विद्यार्थी, शिक्षक, कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यावसायिक, उद्योजक, व्यवस्थापक तसेच व्यक्तिमत्त्व विकासाची आवड असलेल्या प्रत्येक वाचकासाठी मार्गदर्शक ठरेल, अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकातील विचार वाचकांना केवळ माहिती देणार नाहीत, तर त्यांना आत्मपरीक्षण, कृती आणि सातत्यपूर्ण प्रगतीसाठी प्रेरणा देतील, असा विश्वास वाटतो.

या पुस्तकाच्या निर्मितीमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मी मनःपूर्वक ऋणी आहे. विशेषतः सज्जनगड मासिकाचे कार्यकारी संपादक **आदरणीय श्री मधु नेने काका** यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत कारण वेळोवेळी सूचना देऊन त्यांनी मला लिहतं ठेवलं. त्याचबरोबर **समर्थभक्त आदरणीय योगेश बुवा पुरोहित, समर्थभक्त श्री मकरंदबुवा सुमंत** यांच्याप्रती मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच **समर्थ सेवा मंडळ,**

सज्जनगड आणि ‘सज्जनगड’ मासिकाच्या संपादक मंडळाचेही मनःपूर्वक आभार मानतो की त्यांनी या विचारांना वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

'ई- साहित्य'चे संपादक मंडळाचे आणि त्यांच्या टीमचे मनापासून आभार. त्यांच्यामुळे हे पुस्तक सर्वांपर्यंत पोहचवणे शक्य झाले.

वाचकांच्या प्रेमातून, सूचनांतून आणि अनुभवांतून या विचारप्रवासाला अधिक समृद्धी लाभेल, हीच अपेक्षा.

डॉ वीरेंद्र वसंत ताटके

(लेखक)

मोबाईल क्रमांक ९२२५५११६७४ ,

ईमेल आयडी tatakevv@yahoo.com

अनुक्रमणिका

१) कॉर्पोरेट क्षेत्रात 'समर्थ' विचार.

२) समर्थ Mindset

३) प्रभावी संभाषण कौशल्यासाठी समर्थ विचार !

४) समर्थ आणि स्मार्ट.

५) मला एकटे सोडा !

६) समर्थ माणसं, समर्थ संस्था.

७) समर्थ शिक्षक - काळाची गरज.

८) पोटापासून परमात्म्यापर्यंत: मॅस्लो आणि दासबोध

९) कॉनफ्लिक्ट मॅनेजमेंट.

१०) दुसऱ्याची सावली, स्वतःचा मार्ग: जॉब शॅडोइंग आणि दासबोध.

११) वर्क-लाईफ बॅलन्स आणि दासबोध: समतोल जीवनाचे सूत्र.

१२) दासबोधातील ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट !

१३) समर्थ गुंतवणूक सल्लागार.

श्री समर्थ रामदास स्वामी

१) कॉर्पोरेट क्षेत्रात 'समर्थ' विचार

"आपल्या हाताखालच्या लोकांकडून काम करून घ्या आणि यशाच्या दिशेने मार्गक्रमण करा" हा एकविसाव्या शतकातील कॉर्पोरेट क्षेत्राचा मंत्र आहे . कॉर्पोरेट क्षेत्रातील यशाच्या या मंत्राचा अंगीकार करताना 'मानवी स्वभाव ' या घटकाला खूप महत्व येते कारण इतर कोणत्याही घटकांपेक्षा माणसांशी व्यवहार करणे खूप अवघड असते. एखाद्या मशिनकडून काम करून घेणे तुलनेने सोपे असते कारण तिथे कोणत्याही भावना आड येत नाहीत. परंतु तेच काम एखाद्या व्यक्तीकडून करून घ्यायचे झाल्यास अनेक अडचणी येऊ शकतात कारण ते काम करणाऱ्या व्यक्तीच्या भावना त्यामध्ये महत्वाच्या ठरतात. गमतीची गोष्ट म्हणजे कॉर्पोरेट क्षेत्रातील या मानवी हस्तक्षेपाला पूर्णपणे हद्दपार करण्याचे अनेक प्रयत्न होऊनही तो पूर्णपणे संपला नाहीच तर उलट त्याचे महत्व अधिक वाढत गेले. यामुळेच आजकाल कंपन्यांमध्ये नवीन कर्मचारी घेताना त्याच्या भावनिक बुद्ध्यांक (Emotional Intelligence) हा घटक महत्वाचा मानला जात आहे भावभावनां विषयीची जाणीव कॉर्पोरेट क्षेत्रात पूर्वी दुर्लक्षली जायची. सुरुवातीला तर तर भावना दाबून ठेवणे हा गुण मानला जायचा. मात्र कालांतराने त्यात बदल होत गेला आणि आज कॉर्पोरेट क्षेत्रात कर्मचाऱ्यांच्या लोकांच्या भावनिक अडचणींकडे सहानुभूतीने पाहिले जाते; तसेच अनेक ठिकाणी भावना व्यक्त

करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. आपल्या प्रगतीबरोबर इतरांचा सुद्धा थोडा विचार आपण करायला शिकले पाहिजे हा विचार हळहळू कॉर्पोरेट क्षेत्रात रुजू लागला आहे. याच दिशेने ' सामाजिक बांधिलकी ' या विषयाला देखील कॉर्पोरेट क्षेत्रात खूप महत्व प्राप्त झाले आहे. सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून कंपन्यांनी कमावलेल्या नफ्यापैकी थोडा हिस्सा हा समाजातील गरिबांसाठी आणि वंचितांसाठी खर्च व्हावा यासाठी कायदा देखील केला गेला आहे. परंतु केवळ कायदा करून हे होणे शक्य नाही तर त्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्राची मानसिकता बदलली गेली पाहिजे

यामुळेच लोकांचे मन आणि भावना समजावून घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची कॉर्पोरेट क्षेत्रात कधी नव्हे एवढी गरज भासू लागली आहे. आता मन समजावून घ्यायचे तर त्यासाठी मनाचा अभ्यास हवा. हा अभ्यास केवळ भौतिक स्तरावर करून उपयोग नाही तर त्याला अध्यात्माची जोडी हवी. शाळा -कॉलेजातील पुस्तकांमध्ये आणि परीक्षांमध्ये याचा समावेश अगदी अभावानेच आहे. आणि असलाच तर तो अगदी पुस्तकी स्वरूपाचा आहे ज्याचा उपयोग दुर्दैवाने केवळ " घोका आणि परीक्षेत ओका " एवढाच होतो. काही अपवादात्मक ठिकाणी असे कार्यक्रम आयोजित सुद्धा केले जातात परंतु त्यामागे माणुसकीचा ओलावा नसतो त्यामुळे त्यात केवळ यांत्रिकपणा येतो. खरं तर आपण दुसऱ्याला मदत करतो तेव्हा आपण त्याच्यावर उपकार करत नसतो तर अशावेळी देवाने आपल्याला मदत करण्यायोग्य बनवले म्हणून त्याचे आभार मानण्याची भावना मनात यायला हवी .

तसेच ज्याला आपण मदत करत आहोत त्याने आपल्याला मदत करण्याची संधी दिली ही देखील भावना मनात असायला हवी. अर्थात असे भाव मनात येण्यासाठी आपण खूप वेगळ्या पातळीवर असायला हवे. अशा वेळी आपले संत आपल्या मदतीला धावून येतात. त्यातही भौतिक जीवन आणि अध्यात्म यांची योग्य सांगड घालून देणारे समर्थ रामदास स्वामी मदतीला धावून येतात. हाती घेतलेल्या कामाविषयी आत्मीयता , अंतःप्रेरणेने काम करण्याची इच्छा , मानसिक आरोग्य सांभाळण्याची कला , समाजातील वंचितांना मदत करण्याची अंतःप्रेरणा, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे सहानुभूतीने आणि आपल्या दुःखांकडे तटस्थपणे पाहण्याची ताकद यासारख्या अनेक गुणांविषयी (जे आजच्या कॉर्पोरेट क्षेत्रात दुर्मिळ होत चालले आहेत) समर्थांनी ठिकठिकाणी अतिशय सविस्तरपणे मार्गदर्शन केले आहे.

यासाठी त्यांनी मनाला उपदेश केला आणि मनाला सुदृढ करण्यावर कायम भर दिला. आपले मन जर निरोगी असेल तर आयुष्यात येणाऱ्या कोणत्याही दुःखावर मात करता येते असा त्यांचा ठाम विश्वास होता. अर्थात त्यासाठी केवळ वरवरचे उपाय करून उपयोगाचे नाही तर आपल्या मनाचा ठाव घेऊन त्यावर उपचार करायला हवेत. समर्थांनी मनाला केलेला हा उपदेश जेवढा पारमार्थिक जगासाठी उपयोगी आहे तेवढाच भौतिक जगातही उपयोगी आहे. याचाच आढावा आपण येणाऱ्या काही लेखात घेणार आहोत. आजच्या कॉर्पोरेट जगातही समर्थ कसे मदतीला धावून येतात हे समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल परंतु

ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, फायनान्शिअल मॅनेजमेंट, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट यासारख्या कॉर्पोरेट क्षेत्रातील अतिशय परवलीच्या संज्ञा समर्थ त्यांच्या ग्रंथात अतिशय सोप्या पद्धतीने उलगडून दाखवितात . चला तर मग, आजच्या कॉर्पोरेट क्षेत्रातील समर्थ विचारांचा आढावा घ्यायचा प्रयत्न करूयात.

२) समर्थ Mindset

समर्थांनी त्यांच्या ग्रंथांमधून आणि श्लोकांमधून व्यक्तिमत्त्व विकास अर्थात पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटविषयी एवढे सविस्तर मार्गदर्शन केले आहे की आजच्या तरुणाने ते अभ्यासले तर त्याला दुसऱ्या कोणत्याही मार्गदर्शनाची आवश्यकता वाटणार नाही. पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट हा आजच्या कॉर्पोरेट जगात एवढा महत्त्वाचा शब्द झाला आहे की आपली पर्सनॅलिटी सुधारण्यासाठी आणि आपली छाप पुढच्या व्यक्तीवर पाडण्यासाठी प्रत्येकजण अक्षरशः धडपडत असतो. अनेकजण त्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करत असतात. पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटच्या वर्कशॉपला हजेरी लावतात, तज्ञांचा सल्ला घेतात, अगदी खासगी क्लाससुद्धा लावतात. परंतु अशा ठिकाणी दिले जाणारे धडे प्रामुख्याने पाश्चिमात्य विचारसरणीवर आधारित असल्यामुळे आणि त्याला आपल्या मातीचा गंध नसल्यामुळे ते केवळ वरवरचे उपचार ठरतात. त्यामुळे त्यांचा परिणाम तात्कालिक राहतो. व्यक्तिमत्त्वाच्या बाह्य पैलूंवर भर दिला जातो; परंतु मनाची जडणघडण, चारित्र्याची उभारणी, आत्मविश्वास, आत्मसंयम, कर्तव्यनिष्ठा, विवेक आणि जीवनमूल्ये यांसारख्या मूलभूत घटकांकडे अपेक्षित तेवढे लक्ष दिले जात नाही. याउलट समर्थांचे विचार व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासावर भर देतात. त्यांच्या शिकवणीत विचार, आचार, व्यवहार आणि आत्मिक उन्नती यांचा सुंदर समन्वय

दिसून येतो. म्हणूनच समर्थांचे मार्गदर्शन केवळ व्यावसायिक यशासाठी नव्हे, तर एक आदर्श, सक्षम, कर्तृत्ववान आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी आजही तितकेच उपयुक्त, प्रेरणादायी आणि कालसुसंगत ठरते.

सर्वसामान्यांना समजेल अशा सोप्या शब्दात आणि आपल्याकडील उदाहरणांसह दिले तर त्याचा परिणाम दीर्घकाळ राहू शकतो . समर्थांनी ठिकठिकाणी याविषयी भाष्य केले आहे त्याचे महत्त्व न कळल्यामुळे समर्थ सांगतात त्याप्रमाणे आपली अवस्था **" उभा कल्पवृक्षातळी दुःख वाहे | तया अंतरी सर्वदा तेचि आहे ||"** अशी होते. म्हणजे कल्पवृक्षाखाली उभे राहून आपण शोक करत आहोत आणि **"जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा | पुढे मागुता शोक जीवी धरावा"** या उक्तीप्रमाणे आपल्या संतांनी सांगितलेल्या विचारांवरच शंका घेत आहोत आणि नंतर दुःख करत बसत आहोत.

समर्थ सांगतात की वरवर उपाय करण्याऐवजी पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटमधील सर्वात महत्वाचा मुद्धा म्हणजे आत्मपरीक्षण (Self Analysis) असला पाहिजे. **"पहावे आपणासी आपण"** या उक्तीनुसार आपणच आपले परीक्षण तटस्थपणे केले तर बहुतांश काम होते म्हणजेच स्वतःला ओळखा, स्वतःला घडवा आणि स्वतःतील सामर्थ्याला जागे करा. याबरोबरच सज्जन लोकांच्या संगतीत राहिल्याने आपण भक्तिमार्गाला अर्थात चांगल्या मार्गाला लागतो हे सांगताना **समर्थ सदा सर्वदा सज्जनाचेनि योगे । क्रिया**

पालटे भक्तिभावार्थ लागे ॥ असे सांगतात या विचाराला थोडी अधिक प्रभावी आणि प्रवाही मांडणी अशी करता येईल.

अर्थात, सज्जन लोकांच्या सानिध्यात राहावे, म्हणजे आपोआपच आपल्या सुधारण्याची प्रक्रिया सुरू होते. त्यांच्या विचारांचा, आचरणाचा आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा आपल्या व्यक्तिमत्त्वावर नकळत परिणाम होत जातो. अशा सहवासातून आपले विचार अधिक प्रगल्भ होतात आणि जीवनाकडे पाहण्याची दृष्टी अधिक सकारात्मक बनते.

दासबोधातील **उत्तम लक्षण, निस्पृहता लक्षण, चातुर्य लक्षण, वैराग्य निरूपण , महंतलक्षण** हे समास म्हणजे पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटचे वस्तुपाठच म्हणता येतील. याउलट **मूर्खलक्षण आणि पढतमूर्ख लक्षण** हे समास म्हणजे व्यक्तिमत्व विकास करताना काय टाळावे याचे सविस्तर वर्णन म्हणता येतील . थोडक्यात आजच्या कॉर्पोरेट क्षेत्राच्या भाषेत चांगायचे झाले तर पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट करताना काय करावे (Do's) आणि काय करू नये (Don'ts) याचे समर्थ अतिशय सविस्तर मार्गदर्शन करतात.

पर्सनॅलिटी डेव्हल्पमेंटसाठी केवळ शाब्दिक मार्गदर्शन करून समर्थ थांबले नाहीत तर त्यांनी ते सर्व गुण स्वतः मध्ये उतरवून सर्वांपुढे उदाहरण घालून दिले . बाह्यांगाविषयी बोलायचे झाले तर उत्तम उंची, व्यायामाने कसदार झालेले शरीर, पाणीदार डोळे, खणखणीत आवाज आणि चेहऱ्यावर तेज असे त्यांचे दर्शन असायचे . अंगात कमालीची

चपळाई, उत्तम पाठांतर, संगीताची जाण, विविध भाषांची जाण हे त्यांचे काही गुणविशेष सांगता येतील. माणसाचे बोलणे, चालणे, वागणे, लिहणे, वाचणे, काम करणे सारे काही सुंदर असावे असे त्यांना वाटे. त्यासाठी केवळ पुस्तकी शिक्षणाचा उपयोग नाही तर मनाचा अभ्यास व्हायला हवा. मन आणि शरीर जर खंबीर असेल तर आपोआप त्याचे प्रतिबिंब आपल्या व्यक्तिमत्वात पडते. परंतु मन जर दुबळे असेल आणि आणि शरीर निरोगी नसेल तर बाहेरून कितीही प्रयत्न केले तरी त्याचा व्यक्तिमत्त्वावर काहीही सकारात्मक परिणाम होत नाही. अर्थात चांगले व्यक्तिमत्त्व हे केवळ भौतिक गोष्टी साध्य करण्यासाठी नसावे तर त्या माध्यमातून सुद्धा आत्मदर्शन म्हणजेच परमार्थ साधणे हाच हेच अंतिम ध्येय असले पाहिजे असे त्यांना वाटे यातच त्यांचे वेगळेपण होते. समर्थांची आणखी एक खासियत म्हणजे इतरांना उपदेश न करता ते स्वतःच्या मनालाच उपदेश करत आहेत. कारण मानवी आयुष्यातील सुख, दुःख, प्रगती, अधोगती या सर्वांचे मूळ मनापाशीच आहे हे ते जाणून होते . म्हणूनच श्रीमद दासबोधात ते म्हणतात **येथ बोल नाही जनासी । हे अवघे आपणच पासी सिकवावे । आपुल्या मनासी क्षणक्षणा ॥** थोडक्यात तुमच्या परिच्छेदाचा आशय कायम ठेवून शेवटी दोन वाक्ये जोडल्यास व्यक्तिमत्त्व विकासासाठी दारोदारी फिरण्यापेक्षा आपल्या आत जरा डोकावून पाहिले तर बरेचसे काम होते, हे जाणून समर्थांनी त्याला अधिक महत्त्व दिले. याबरोबरच चारचौघांत कसे वागावे, कसे बोलावे याचे सविस्तर मार्गदर्शन समर्थ त्यांच्या ग्रंथातून अगदी साध्या-सोप्या

भाषेत करतात. **स्वतःच्या गुण-दोषांचे भान ठेवून त्यावर योग्य प्रकारे काम करण्याची प्रेरणा त्यांच्या विचारांतून मिळते. त्यामुळे समर्थांचे विचार हे केवळ आध्यात्मिक मार्गदर्शन न राहता, उत्तम व्यक्तिमत्त्व घडविण्याची व्यवहार्य जीवनदृष्टी ठरतात.** अर्थात ते सर्व अंगीकरण्यासाठी आपण धीर धरायला हवा. समर्थ विचारांवर विश्वास ठेवून त्या दिशेने हळहळू चालण्याचा प्रयत्न करायला हवा. हळूहळू आपल्या व्यक्तिमत्वात बदल घडायला लागेल आणि आपल्या लक्षात येईल की आपण एवढे दिवस इकडेतिकडे धावाधाव करून साध्य करण्याचा प्रयत्न करत होतो ते उत्तम व्यक्तिमत्व समर्थ विचारांनी सहजसाध्य होऊ शकते.


'वचने बोलावी करुणेची।
नाना प्रकारे स्तुतीची।
अंतरे निवती सकळांची।
ऐसे वदावे ॥'
समर्थ रामदास स्वामी

3) प्रभावी संभाषण कौशल्यासाठी समर्थ विचार !

॥ वचने बोलावी करुणेची । नाना प्रकारे स्तुतीची । अंतरे निवती सकळांची । ऐसे वदावे ॥

या एका श्लोकाने समर्थ रामदास स्वामींनी संभाषण कौशल्याचे महत्त्व सांगितले आहे. आधुनिक जगातील कॉर्पोरेट क्षेत्रातील तज्ञ सांगतात की दैनंदिन व्यवहारात एकमेकांशी संवाद साधताना काही नियमांचे पालन करावे. मनात आलेले बोलून टाकावे हे खरे असलेतरी बोलताना काही तारतम्य बाळगावे. आजकाल संभाषण कौशल्य कसे असावे यासाठी जे आजकाल व्यक्तिमत्व विकासाच्या अभ्यासक्रमामध्ये शिकवले जाते ते समर्थ रामदास स्वामींनी चारशे वर्षांपूर्वी सांगून ठेवले आहे

खरेतर शाळेच्या प्रवेशापासून या संभाषण कौशल्याची चाचणी सुरुवात प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे होते. प्रश्न, शंका विचारणं, उत्तर देणं, मुलाखत, तोंडीपरीक्षा, प्रकल्प सादर करणं, चर्चा, परिसंवाद, स्पर्धेत भाग घेणं, नवे मित्र जोडणं-जोडलेले टिकवून ठेवणं या सगळ्यांतून मुलाचं संभाषण कौशल्य अजमावलं जात असतं. अर्थात संवाद साधताना देहबोलीचे तेवढेच महत्व आहे हे देखील मुलांना सांगणे आवश्यक असते. समोरची व्यक्ती बोलत असताना चेहऱ्यावर तुसडे हावभाव असणे, मुद्रा त्रासदायक असणे, समोरच्याचं ऐकताना जांभई

देणे, समोरच्याकडे पाठ फिरवणे, नखं कुरतडणे या गोष्टी टाळायला हव्या,हे मुलांना लहान वयातच शिकवायला हवे.

शिक्षण झाल्यानंतर नोकरी -व्यवसाय सुरु केल्यानंतर तर या संभाषणकौशल्याचे महत्व अजूनच वाढते. कॉर्पोरेट क्षेत्रात या संभाषण कौशल्यासाठी खूप मेहनत घेतली जाते आणि अगदी छोट्या छोट्या -मूलभूत मुद्द्यांवर मार्गदर्शन केले जाते. सर्वप्रथम आवाजावर ताबा मिळवण्यावर भर दिला जातो. कारण वरच्या पट्टीतील आवाज फार काळ ऐकणे कठीण असते. यामुळे सोबत काम करणाऱ्या लोकांना त्रास होऊ शकतो म्हणून हळू आवाजात आणि सामान्य पट्टीत बोलावे असा सल्ला दिला जातो. तसेच फार वेगाने बोलू नये, एकाच लयीत कंटाळवाणे बोलणे टाळावे, परत परत तेच बोलणे टाळावे, उच्चारात स्पष्टता असावी, आपल्या बोलण्यात मोठी शब्दसंपदा असावी यासारखे अनेक सल्ले दिले जातात.

आपल्याला आश्चर्य वाटेल परंतु समर्थांनी त्यांच्या साहित्यात या सभांतून कौशल्याविषयी तपशीलवार मार्गदर्शन केले आहे. यासाठी अगदी सोपा आणि मूलभूत नियम ते सांगतात तो म्हणजे आपल्या बोलण्यातून कळकळ दिसली पाहिजे तरच पुढचा माणूस ते मनापासून ऐकेल आणि आपले बोलणे मृदू असले पाहिजे जेणेकरून कोणाचे मन दुखावले जाणार नाही.

विचारुनि बोले विवंचूनि चाले। तयाचेनि संतप्त ते ही निवाले। बरें शोधिल्यावीण बोलो नको हो। जनीं चालणें शुध नेमस्त राहो।

या श्लोकात समर्थ संभाषण कौशल्याचे सार सांगतात. हा श्लोक म्हणजे संभाषण कौशल्याची नियमावलीच म्हणता येईल कारण या एका श्लोकातून समर्थ संभाषण कौशल्याविषयी अनेक नियम सांगतात. पहिला नियम म्हणजे बोलण्यापूर्वी विचार करायला हवा, बोलल्यानंतर विचार करून उपयोग नाही. " शब्द हे धनुष्यातील बाणाप्रमाणे असतात, सोडण्यापूर्वी विचार करा " हे प्रसिद्ध वाचन आपल्याला माहित आहेच.

संभाषण कौशल्यातील दुसरा नियम म्हणजे 'विवंचून चाले '! अर्थात कृती अशी करावी की त्याचा परिणाम काय होईल, याचा विचार आधीच करावा. रागाची आग बाहेर टाकल्यानंतर जो भडका उडतो, त्याची विवंचना मागून करीत बसण्यापेक्षा, त्या रागाची कल्पना आधीच केला तर पुढील अनर्थ टळेल.

तिसरा नियम म्हणजे बोलण्यापूर्वी सत्य काय आहे ते शोधावे म्हणजे नंतर पश्चातापाची वेळ येणार नाही. लोकांशी वागताना मोकळ्या मनाने वागावे; म्हणजे आपण जरी वरवर रागावलो तरी तो राग आतमध्ये बाधत नाही. चौथा नियम म्हणजे "नेमस्त रहावे". नेमस्त म्हणजे नियम पाळणारा आपले आयुष्य शिस्तबद्ध आणि नियमबध्द असेल तर आपल्याला रागाचे झटके येत नाहीत. कधीही

टोकाची भूमिका न घेता मध्यम मार्गाने जाउन सर्व समावेशक निर्णय घ्यावा म्हणजे नंतर संतापाची वेळ येत नाही. समर्थ सांगतात की संभाषण कौशल्य म्हणजे केवळ बोलण्याची कला नव्हे तर आपले एकूणच वागणे कसे असावे याचे नियम. कारण केवळ चांगले बोलून आपले व्यक्तिमत्व सुधारणार नाही तर त्याप्रमाणे आपण वागले पाहिजे. समर्थांनी संभाषण कौशल्याविषयी केवळ लिहले नाही तर त्याचे प्रात्यक्षिक सुद्धा दिले. स्वतः समर्थ उत्तम कीर्तनकार होते. त्यांनी स्थापन केलेल्या मठामधील मठाधिपतींना देखील हाताखालील लोकांशी योग्य संवाद साधण्यासाठी नियमावली होती. **दासबोधातील उत्तम पुरुष , महंत लक्षण** हे समास वाचल्यानंतर समर्थांचे याविषयीचे विचार आपल्या लक्षात येतात.

थोडक्यात सभांषणकला म्हणजे केवळ बोलण्याची कला नव्हे तर जगण्याची कला असा समर्थ विचार रामदास स्वामींनी मांडला जो आजच्या काळातही तेवढाच योग्य वाटतो.


केल्याने होत आहे रे।
आधी केलेचि पाहिजे॥
— समर्थ रामदास स्वामी

४) समर्थ आणि स्मार्ट

मॅनेजमेंट क्षेत्रातील तज्ञ पीटर ड्रकर व्यावसायिक यशाचे रहस्य सांगताना म्हणतात “ आपण SMART आहोत का हा प्रश्न स्वतःला विचारा . आपण जर SMART नसू तर आपण करत असलेले कष्ट वाया जाऊ शकतात.” आपण आजूबाजूला पाहतो की आपला एखादा मित्र खूप कष्ट करतो पण त्याला तेवढं यश मिळत नाही. अशा मित्राविषयी बोलताना आपण सहजपणे म्हणतो " तो HARD WORK करतो पण तो SMART नाहीये.". क्रिकेटच्या भाषेत सांगायचे तर एखादा फलंदाज खूप चांगली फलंदाजी करत आहे , त्याचे पदलालित्य उत्तम आहे , फटक्यांची निवड देखील उत्कृष्ट आहे पण त्याच्या धावा काही होत नाहीत. याचे कारण म्हणजे त्याची फलंदाजी उत्तम असली तरी स्मार्ट नाहीए, दोन क्षेत्ररक्षकांच्या मधून फटका मारण्याचे स्मार्ट कसब त्याने मिळवलेले नाही.

आयुष्यात यश मिळवायचे असेल तर या स्मार्ट फलंदाजाप्रमाणे दोन क्षेत्ररक्षकांमधून म्हणजेच दोन अडचणींमधून आपण आपला चेंडू मारण्याचे कसब कमवायला हवे. चला तर मग, पीटर ड्रकर यांच्या मनातील SMART या शब्दाची फोड करून पाहुयात.

विशेष म्हणजे पीटर ड्रकर यांनी सांगितली हे कौशल्य समर्थ रामदासस्वामींच्या ग्रंथात देखील आढळते.

१) S – Specific (नेमके ध्येय)

जर आयुष्यातील आपले ध्येय नेमके आणि स्पष्ट असेल तर यश मिळण्याची शक्यता वाढते. केवळ ढोबळ ध्येय ठेवून आपण वाटचाल करू लागलो तर आपली वाट अवघड होऊ शकते.

उदाहरणार्थ महाविद्यालयातील एक विद्यार्थी म्हणाला की खूप चांगले करियर करण्याचे माझे ध्येय आहे. दुसरा विद्यार्थी म्हणाला की मला बँकेच्या परीक्षा उत्तीर्ण होऊन बँकेमध्ये चांगले करियर करायचे आहे. या दोघांपैकी कोणाच्या करियरची दिशा स्पष्ट आहे असे तुम्ही म्हणाल? आणखी एक उदाहरण पाहुयात. एक गृहिणी म्हणाली की दिवसभरात घरातील काम आटपून मी स्वतःसाठी वेळ राखून ठेवणार आहे . दुसरी गृहिणी म्हणाली की दररोज संध्याकाळी चार ते पाच या वेळेत मी कॉम्प्युटरचा क्लास करणार आहे. त्यासाठी मी या आठवड्यातच प्रवेश घेणार आहे. या दोघींपैकी कोणाचे विचार स्पष्ट आहेत? बेढब तब्येतीचा एक तरुण म्हणाला की मी योग्य प्रकारे व्यायाम करून माझे शरीर सुडौल करण्याचा विचार करतोय. त्याचा मित्र म्हणाला की रोज बारा सूर्यनमस्कार घालायला सुरुवात केली आहे आणि दर आठवड्याला मी एक जास्त सूर्यनमस्कार वाढवत जाणार आहे. तुम्ही सांगा, कोणाचे शरीर लवकर सुडौल होईल? एक लेखक म्हणाला की मला एखाद्या उत्तम विषयावर पुस्तक लिहायचे आहे. दुसरा लेखक म्हणाला की मी शेतीविषयक एक पुस्तक

लिहायला सुरवात केली आहे . दोघांपैकी कोणाचे पुस्तक लवकर पूर्ण होण्याची शक्यता आहे ?. आपले ध्येय स्पष्ट शब्दात मांडणे ही देखील एक कलाच आहे. त्यासाठी आपल्या डोक्यात त्याची स्पष्ट कल्पना हवी नाहीतर आपण केवळ मोठमोठ्या गप्पा मारत बसतो आणि अशा बाष्कळपणे बडबड करत राहणाऱ्याला कोणीच गांभीर्याने घेत नाही.

२) M –Measurable (मोजता येण्यासारखे)

आपले ध्येय, आपली उद्दिष्टे मोजता येण्यासारखी आहेत का ? हे थोडसं अवघड आहे. प्रत्येक वेळी हे शक्य होईलच असे नाही. मी अमुक एक रक्कम पगार असलेली नोकरी मिळवीनच असं म्हणणं शक्य आहे परंतु "मी चांगला वागेन " या वाक्यातील यश किंवा उद्दिष्ट कसे मोजणार ? कारण प्रत्येक गोष्ट मोजता येणे अवघड असते. अशावेळी समर्थांचे "पहावे आपणासी आपण " हे वचन लागू पडते. खरं तर समर्थानी हे वचन आत्मज्ञानाच्या जाणिवेविषयी म्हणले आहे. तरीदेखील आपण भौतिक जगातील आणि प्रपंचातील प्रगती मोजण्यासाठी फुटपट्टी म्हणून त्या वचनाचा उपयोग करू शकतो . आपणच आपल्याला प्रश्न विचारावा कि माझ्या स्वतःमध्ये मला अपेक्षित असलेली प्रगती झालेली आहे का ? अर्थात या प्रश्नाचे खरे उत्तर आपणच आपणाला दिले पाहिजे . अन्यथा केवळ मनाचे

समाधान होण्यासाठी आपण होकारार्थी उत्तर देत असू तर ती आपली स्वतःची फसवणूक ठरेल.

३) A- Achievable (आवाक्यातील ध्येय)

तरुणांनी SMART होण्यामधील पुढील टप्पा म्हणजे आपण ठेवलेले ध्येय वास्तवाला धरून आहे का हे तपासून पहाणे. आपले ध्येय आकाशातील चंद्र-तारे तोडून आणण्यासारखे कल्पनेतील असेल तर ते कधीच साध्य होणार नाही आणि आपण कायमच दुःखी राहू .म्हणूनच आपले ध्येय आपल्याला झेपणारे हवे. अर्थात हा मुद्द्यांवर मतांतरे असू शकतात. काही लोकांच्या मते आपले ध्येय आवाक्यातील असेल तर आपण निवांत होतो, आळशी होतो. कॉलेजात शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने जर कॉलेजचा अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी घेणे हे ध्येय ठेवले तर त्यात काही विशेष नाही . त्याने शेवटच्या वर्षाचा अभ्यासपूर्ण करून पदवी घेतलीच पाहिजे परंतु डोक्यामध्ये पुढील उद्दिष्ट हवे. महान फलंदाज सचिन तेंडुलकर एका मुलाखतीत म्हणाले होते की माझी नजर गोलंदाजाकडून येणाऱ्या पुढील चेंडूवर असते परंतु माझे लक्ष शतकाकडे असते. याचाच अर्थ म्हणजे आपले ध्येय आपण दोन भागात विभागले पाहिजे. दीर्घकालीन ध्येय आपण छोट्या छोट्या अशा आवाक्यातील उद्दिष्टांमध्ये विभागले पाहिजे, आपल्या मुख्य ध्येयाशी सुसंगत असलेले अगदी प्रत्येक दिवसाचे '

टार्गेट ' ठरवून घेतले पाहिजे आणि त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. अशा प्रकारे अवघड वाटणारे ध्येय सोपे होते.

आमच्या परिचयातील एका गृहस्थांनी सांगितले की त्यांच्या कुटुंबात एकूण पाच व्यक्ती आहेत. त्यांच्यापैकी प्रत्येक जण दर वर्षी एक नवीन झाड एखाद्या ओसाड जागेत लावून त्याचे संगोपन करतो. साधारणतः एका वर्षभरात ते झाड स्वतःच्या जीवावर जगण्यायोग्य होते. एका वर्षात ते कुटुंब पाच नवीन झाडे लावते आणि जगवते. हा उपक्रम त्यांनी वीस वर्षे करायचे ठरवले आहे. वीस वर्षानंतर या एका कुटुंबाने जवळजवळ शंभर झाडे लावून जगवलेली असतील. मित्रांनो विचार करा, अशा विचाराची अनेक कुटुंबे तयार झाली तर हजारो झाडे लावण्याचे काम सहजशक्य आहे.

४) Relevant (सुसंगत)

आपले ध्येय आपल्या जीवनाशी सुसंगत आहे का हा देखील विचार प्रत्येक तरुणाने करायला हवा. नाहीतर " जायचंय मुंबईला आणि बसलाय कोल्हापूरला जाणाऱ्या गाडीत " या गमतीशीर वाक्यासारखी आपली अवस्था होऊ शकते. कोल्हापूरला जाणारी गाडी कोल्हापूरला पोहचल्यानंतर मुंबईला जाणे अशक्य नसले तरी ते वेळ-श्रम-पैसे यांची नासाडी ठरू शकते. उदाहरणार्थ वैदयकीय अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने बँकेत करियर करणे

अशक्य नसेल तरी अवघड आहे कारण त्या विद्यार्थ्यांचे ध्येय आणि तो सध्या घेत असलेले शिक्षण याचा फारसा संबंध नाहीए.

मित्रांनो मला सांगा, " जगात काहीही अशक्य नाही " हे वाक्य वाचायला चांगले वाटत असले तरी विनाकारण सोप्या कामाचे रूपांतर अवघड कामात कशाला करायचे ? यासाठी आपले ध्येय ठरविताना आपल्या आवडीनिवडी लक्षात घेतल्या तर पुढील सर्व घोटाळा टाळता येऊ शकतो ना !

५) T – Time Bound (वेळेचे बंधन)

वेळेचे बंधन नसलेले ध्येय फक्त कल्पनेत राहण्याची शक्यता असते. अशा प्रकारे नुसते हवेत कल्पनेचे इमले बांधणाऱ्या तरुणांची ' कागदावरील योजना ' म्हणून हेटाळणी होऊ शकते. कागदावरील योजना करताना मोठमोठ्या योजना आखल्या जातात परंतु प्रत्यक्षात मात्र त्यापैकी अनेक कामे वेगवेगळ्या कारणांमुळे केवळ कागदावरच राहतात. वेळेचे बंधन नसणारे आपले 'प्लॅन ' देखील केवळ कागदावर राहण्याची शक्यता असते. हे टाळायचे असेल तर आपले ध्येय छोट्या छोट्या टप्प्यामध्ये विभागावे आणि प्रत्येक टप्प्यासाठी वेळापत्रक आखावे.

ज्याप्रमाणे रेल्वे स्टेशनमध्ये येणारी प्रत्येक रेल्वे ही वेळापत्रकातील वेळेप्रमाणेच धावेल याची खात्री नसते तरीदेखील त्या वेळापत्रकामुळे एखादी रेल्वे वेळेत आहे, वेळेच्या आधी आहे की

उशिरा आहे याची माहिती मिळते त्याचप्रमाणे आपल्या छोट्या छोट्या उद्दिष्टांचे वेळापत्रक केले तर आपण वेळेत आहोत की नाही याची आपल्याला टोचणी लागून राहते.

समर्थ रामदास स्वामींचा SMART सल्ला

मित्रांनो, समर्थांनी वेळोवेळी स्मार्ट होण्याचा सल्ला त्यांच्या साहित्यातून दिला आहे. उदाहरणार्थ, ते म्हणतात की आपल्या प्रगतीचा आढावा आपण स्वतःच घेतला पाहिजे — ***"पाहावे आपणाशी आपण".*** वेळेचे महत्त्व सांगताना ते म्हणतात — ***"ऐक सदैवपणाचे लक्षण। रिकामा जाऊ नेदी एक क्षण।"*** त्यामुळे वेळेचे योग्य नियोजन करण्याची प्रेरणा मिळते. ***"बाष्कळपणाची वटवट करूच नये"*** या ओवीतून अनावश्यक बोलणे टाळून कृतीकडे लक्ष देण्याचा संदेश मिळतो. ***"केल्याने होत आहे रे। आधी केलेचि पाहिजे॥"*** या वचनातून सतत कार्यरत राहण्याची ऊर्जा मिळते. तसेच ***"पेरले ते उगवते। बोलिल्यासारखे उत्तर येते॥"*** हे सांगताना समर्थ प्रयत्नांचे फळ नक्की मिळते, हा आत्मविश्वास देतात.

याशिवाय समर्थांनी आत्मविश्वास, संयम, शिस्त, सातत्य आणि सकारात्मक विचार यांनाही तितकेच महत्त्व दिले आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात SMART म्हणजेच Self-analysis, Management of time, Action orientation, Right attitude आणि Team spirit या गुणांची अत्यंत गरज आहे. समर्थांचे विचार हे केवळ

अध्यात्मापुरते मर्यादित नसून व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर घडवण्यासाठीही अत्यंत उपयुक्त आहेत. समर्थ रामदास स्वामींचे वैशिष्ट्य असे की त्यांनी केवळ उपदेश केला नाही, तर **जगण्याची दिशा आणि कृतीची प्रेरणा** दिली. मनाला योग्य विचारांची शिस्त लावणे, आपल्या सामर्थ्याची जाणीव करून घेणे आणि ध्येयाच्या दिशेने सातत्याने प्रयत्न करणे, यासाठी त्यांचे मार्गदर्शन आजही तितकेच मोलाचे आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ ग्रंथातील शिकवण म्हणून न पाहता, रोजच्या जीवनातील मार्गदर्शक तत्त्वे म्हणून पाहिले तर आपल्या निर्णयक्षमतेत, कार्यक्षमतेत आणि व्यक्तिमत्त्वात निश्चितच सकारात्मक बदल घडू शकतो. **समर्थांचे विचार आपल्याला परिस्थितीवर तक्रार करण्याऐवजी स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची प्रेरणा देतात.**

मित्रांनो, करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी यापेक्षा आणखी काय पाहिजे?


अखंड येकांत सेवावा।
अभ्यासचि करीत जावा।
काळ सार्थकची करावा। जनासहित॥
समर्थ रामदास स्वामी

५) मला एकटे सोडा !

मित्रांनो, आपण अनेकदा चिडून-वैतागून तर कधी कंटाळून " लीव्ह मी अलोन " म्हणजेच " मला एकटे सोडा " म्हणतो. पण असा चिडून मिळवलेला एकटेपणा आणि आनंदाने स्वीकारलेला एकांत यातील फरक आपल्याला माहित आहे का ? खरं सांगा आपण कधी एकांताचा अनुभव घेतला आहे का ? आणि घेतला असेल तर तो एकांत होता की एकटेपणा होता याचा तुम्ही विचार केला आहे का ? एकटेपणा हा निराशेतून आलेला असतो, दुःखातून आलेला असतो आणि त्यामध्ये खंत असते. एकांत हा स्वेच्छेने निवडलेला असतो आणि तो कोणत्याही दुःखातून आलेला नसतो तर सर्व काही चांगले असताना आपण निवडलेला सुखदायक पर्याय असतो. वरवर पाहता असे वाटेल की एकांत मिळवणे आपल्या हातात असेल आणि तो उपभोगणे किती सोपे असेल. पण प्रत्यक्षात मात्र एकांत मिळणे अवघड आहे. विशेषतः आजकालच्या धकाधकीच्या आयुष्यात तर एकांत मिळणे खूपच अवघड आहे.

मित्रांनो, जरा आपली दिनचर्या पहा. सकाळी झोपेतून उठल्याबरोबर आपल्या हातात मोबाईल येतो. व्हाट्सअँप, फेसबुक बघत बघतच आपल्या दिवसाची सुरुवात होते. सकाळची कामे आवरताना तर आपली एवढी धांदल उडते की एकांताचा विचार करणे सुद्धा आपल्या मनात येत नाही. त्यानंतर आपल्या कामाला जायची

गडबड ! आता पूर्वीसारखे कामावर चालत जाणारा माणूस किंवा शाळा - कॉलेजात जाणारा विद्यार्थी शोधून काढावा लागेल . सायकल, बस, स्वतःची किंवा मित्राची दोन चाकी किंवा चार चाकी यापैकी एका वाहनाचा आधार घेऊन आपण आपल्या कामाच्या ठिकाणी किंवा शाळा- कॉलेजात जातो. मला सांगा प्रवासात तरी आपल्याला एकांत मिळतो का? आजूबाजूला वाहनांची आणि लोकांची गर्दीमध्ये आपण हरवून जातो. दिवसभराचे कामकाज केल्यानंतर घरी आल्यानंतर इच्छा असो किंवा नसो, घरात टीव्ही सुरु असतो जो आपले रात्रीचे जेवण होऊन झोपेपर्यंत आपली साथ देतो. त्यात अधूनमधून मोबाईल फोन आहेच. झोपेतून उठल्यावर पुन्हा सकाळपासून तेच चक्र सुरु ! सुटीच्या दिवशी खरेदी, फिरणे यात आपला वेळ जातो. अगदी व्यायाम करताना देखील संगीत सुरु असतं. पूजा करताना एकांत मिळतो असं म्हणावं तर आजूबाजूला गडबडगोंधळ सुरु असतोच. या सगळातून एकांत कधी मिळणार ? क्षणभर समजा की अट्टाहासाने आपण असा वेळ काढला आणि एकांतात बसलो. मला सांगा, बाहेरचा गोंधळ थांबला तरी मनातील थांबतो का ? उलट अशाच वेळी मनाची घालमेल अधिक वाढते असे अनुभव सांगतो.

एकांत मिळण्यासाठी धडपड :-

जरा बारकाईने पहा, आपली बरीचशी धडपड ही एकांत मिळवण्यासाठी सुरु असते. सहलीला जायचे तर गर्दी असलेली ठिकाणे टाळून विशेष कोणाला माहित नसलेले ठिकाण शोधून काढायचा प्रयत्न आपण करतो . खरेदी करायची असेल तर कमी गर्दी असलेले दुकान शोधतो, परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी एकांत असलेली जागा निवडतो. एवढंच काय, शहरात फ्लॅट घेताना देखील वरच्या मजल्यावर असलेल्या फ्लॅटला पसंती देतो. वरच्या मजल्यावर वाहनांचा आवाज कमी येतो, शहरातील निसर्ग (?) अधिक चांगला दिसतो या कारणांबरोबरच आपण जेवढे वरच्या मजल्यावर जाऊ तेवढा अधिक एकांत मिळण्याची शक्यता वाढते हे देखील एक कारण असते. एकांताचे महत्वच तसे आहे. एकांतात विचारांचा गोंधळ कमी होतो आणि आपले मन शांत होते. काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात एक बातमी होती कि एकांत मिळवण्यासाठी परदेशात जगातील सर्वात शांत खोली तयार करण्यात आली आहे. असं म्हणतात कि एवढी शांत जागा जगात कुठेही सापडणार नाही. ही खोली ९९ ते १०० टक्के ध्वनिविरहित (Soundproof) आहे. या खोलीत म्हणे आपल्याला आपल्या श्वासोश्वासाचा देखील आवाज स्पष्टपणे ऐकू येतो. याच वैशिष्ट्यामुळे जगातली सर्वात शांततापूर्ण जागा म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने देखील त्यांच्या यादीमध्ये या खोलीला स्थान दिलं आहे. याचा सरळसरळ अर्थ असा होतो की इतर सर्व सुखे मिळाली

तरी अंतिम सुख म्हणजे मनाची शांतता ! आणि ही शांतता आपल्याला एकांतातच मिळू शकते. अर्थात बाहेरील गोंधळ संपला तरी आतील गोंधळ सहजासहजी संपतो का? तो संपवण्यासाठी आपण सराव करायला हवा, प्रयत्न करायला हवेत.

मित्रांनो, मला माहित आहे की तुमच्या करियरमध्ये प्रत्येक क्षण तुमच्यासाठी महत्वाचा आहे. पण यामुळे एकांताचे महत्त्व कमी होत नाही. एकांताच्या क्षणांमध्येच कदाचित तुम्हाला अवघड वाटणाऱ्या आयुष्यातील कोड्याचे उत्तर मिळू शकते. म्हणूनच एकांताची सवय हळूहळू लावून घेतली पाहिजे.

<u>एकांत मिळविण्यासाठी सराव :</u>

एकांताची सवय लावून घेण्याच्या प्रक्रियेतील पहिला मुद्दा म्हणजे सुरुवातील अगदी घड्याळ लावून काही मिनिटे एकांत अनुभवायचा प्रयत्न करावा. वाटतं तेवढं हे सोपं नाहीए. यापूर्वी असा प्रयत्न केला नसेल तर ते अगदीच जीवघेणे देखील ठरू शकते. मात्र प्रयत्न सोडू नयेत. एकांत ही गोष्ट मागून मिळत नाही. तो कौशल्याने मिळवावा लागतो. त्यासाठी घरातील आपल्या स्थानात बदल करून पहावा. घरात एखादा निवांत कोपरा निवडावा. हळूहळू दैनंदिन जीवनाचा भाग म्हणून एकांताकडे पाहिल्यास त्याची सवय होते. हळूहळू अशा एकांताचा कालावधी वाढवत जावा आणि त्यामध्ये विचारशून्य

होण्याचा प्रयत्न करून पहावा. “Be yourself, transform yourself and transcend yourself” असा संदेश देणारे महायोगी अरविंद सांगत की स्वत:च्या आत पोहोचण्यासाठी एकांताच्या रूपाने वाटय़ाला येणारी शांतता अत्यंत आवश्यक असते. आपल्या हातून घडलेल्या चुकांचे चिंतनही एकांतात करता येते. अशा वेळी “पहावे आपणाशी आपण “ या समर्थ वचनाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करावा .

माहितीचा उपवास.

ज्याप्रमाणे आपण पोटाचा उपवास करतो त्याप्रमाणे माहितीचा उपवास करण्याचा प्रयत्न करावा. पोटाचा उपवास केला की पोटाला आराम मिळतो, मन शुद्ध आणि शांत होण्यास मदत होते. अशाच प्रकारे माहितीचा उपवास करण्याचा प्रयत्न करावा. आठवड्यातून एखादे दिवशी जगातील माहिती घेण्याचे पूर्णपणे थांबवावे. त्या दिवशी वर्तमानपत्र , टेलिव्हिजन , इंटरनेट , फेसबुक , व्हाट्सअँप या सारख्या उपयोगी आणि बऱ्याच वेळा निरूपयोगी माहिती देणाऱ्या स्रोतांपासून दोन हात दूर रहावे . माहितीचे हे स्रोत आधुनिक जीवनात खूप महत्वाचे आहेत यात अजिबात शंका नाही परंतु त्यातून माहितीचे असंख्य असंबद्ध तुकडे वाचण्यात आपला बराच वेळ जातो. या माध्यमातून अनेक बातम्या, घडामोडी , मित्रांचे अपडेट्स, वाढदिवस, फोटो, व्हिडीओ, सणाच्या शुभेच्छा या आपल्या मेंदूवर आदळत

असतात. यापैकी कित्येक माहिती तर आपण समजून घेण्याचा प्रत्यन न करता फक्त पुढे पाठविण्याच्या गडबडीत असतो. अशा दिवशी वाचन करताना देखील काळजी घ्यावी. समर्थांनी " प्रसंगी अखंडित वाचीत जावे " असे सांगितले असले तरी आपण काय वाचत आहोत याचा निदान अशा उपवासाच्या दिवशी तरी थोडा विचार करून अनावश्यक वाचन टाळावे.

या बाबतीत झालेल्या एका संशोधनात असे म्हणले आहे की आपला मेंदू हा वेगवेगळे दिवे लागलेला एक बोर्ड आहे असे समजले तर येणारी प्रत्येक माहिती एक एक दिवा दर्शवित असते. अशा या दिव्यांची सतत उघडझाप सुरु असते ज्यामुळे आपला मेंदू गडबडून जाऊ शकतो . याचा परिणाम म्हणजे आपली कार्यक्षमता क्षीण होऊन एकाग्रता कमी होते. त्यामुळे अशा गोष्टींपासून उपवासाच्या दिवशी दूर रहावे. असा प्रयत्न केल्यानंतर आपल्या लक्षात येईल की अनेकदा आपण विनाकारण या गोष्टी करत असतो . एखादे दिवशी आपला मोबाईल बंद पडला किंवा इंटरनेट आणि टीव्ही बंद पडला तरी त्यामुळे आपले फारसे बिघडत नाही. या निमित्ताने एक विनोद आठवला. एका पत्नी आपल्या पतीला सांगते " आज देवपूजा खूप छान झाली. घरातील देखील खूप लवकर आवरून झाले." त्यावर पती विचारतो " आज घरातील इंटरनेट बंद होते का ?"

मित्रांनो एक लक्षात ठेवा, सामान्य माणसाला एकांत साधणे एकदम जरी अवघड वाटत असले तरी हळूहळू आपण त्या दिशेने

जायला हवे. कदाचित सुरुवातीला आजूबाजूच्या लोकांकडून आपल्याला 'एकटेच का बसलात? काही त्रास होतोय का ? ' असे उदगार ऐकायला मिळतील. पण कालांतराने त्यांना देखील सवय होईल.

समर्थांनी सांगितलेले एकांताचे महत्त्व :

समर्थांनी ठिकठिकाणी एकांताचे महत्त्व सांगितले आहे. ***"अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा । काळ सार्थकची करावा । जनासहित ॥"*** हे सांगून समर्थ सुचवितात की अभ्यास, चिंतन आणि आत्मपरीक्षण करण्यासाठी एकांत अत्यंत उपयुक्त आहे. एकांतात मन एकाग्र होते, विचारांना दिशा मिळते आणि व्यक्तीला स्वतःच्या गुण-दोषांचे अवलोकन करता येते. एकांत म्हणजे समाजापासून दूर जाणे नव्हे, तर स्वतःला अधिक सक्षम आणि कार्यक्षम बनविण्याची प्रक्रिया होय. एकांतात अभ्यास करून ज्ञान आत्मसात करावे आणि त्यानंतर ते ज्ञान व अनुभव समाजाच्या हितासाठी वापरावा. अशा प्रकारे समर्थांनी वैयक्तिक विकास आणि सामाजिक योगदान यांचा सुंदर समन्वय साधला आहे. आधुनिक मानव संसाधन व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही ही संकल्पना महत्त्वाची असून, कर्मचाऱ्यांच्या learning, self-development आणि continuous improvement साठी चिंतन व स्व-अभ्यासाला योग्य संधी देणे आवश्यक ठरते.

एकांताचे फायदे सांगताना समर्थ म्हणतात, ***"येकांती विवेक ठाई पडे । येकांती येत्न सापडे । येकांती तर्क वावडे । ब्रह्माण्डगोळी ॥"*** एकांतामध्ये मन अधिक स्थिर होते, विचारांना योग्य दिशा मिळते आणि एखाद्या विषयाचा सखोल विचार करता येतो. सततच्या धावपळीपासून थोडे दूर गेल्यावर आपल्या मनातील गोंधळ कमी होतो आणि निर्णय घेण्याची क्षमता अधिक स्पष्ट होते.

एकांतात बसून स्मरण करावे म्हणजे आपल्या चुका आपल्या लक्षात येतात, हे सांगताना समर्थ म्हणतात, ***"येकांती स्मरण करावे । चुकले निधान पडे ठावे । अंतरात्म्यासरिसें फिरावे । काही तरी ॥"*** म्हणजेच एकांत हा केवळ एकटे राहण्याचा विषय नसून **स्वतःशी संवाद साधण्याची संधी** आहे. दिवसभराच्या कामकाजात आपण इतरांशी संवाद साधतो; परंतु काही वेळ स्वतःसाठी राखून ठेवला तर आपल्या विचारांचे, भावनांचे आणि कृतींचे आत्मपरीक्षण करता येते.

सरते शेवटी समर्थ सांगतात की ज्याला एकांत आवडला त्याला सर्वांच्या अगोदर ज्ञान होते आणि ज्याला आयुष्यात मोठे व्हायचे आहे त्याला एकांताशिवाय पर्याय नाही. जगामध्ये जे थोर विचारवंत होऊन गेले, त्यापैकी बहुतेकांना एकांताची खूप आवड होती आणि केवळ नाईलाज म्हणून ते समाजात येत असत, हे सांगताना समर्थ म्हणतात — ***"जयास येकांत मानला । अवघ्या आधी केले त्याला । त्यावेगळें वडिलपणाला । ठावचि नाहीं ॥"***

आजच्या मोबाईल, सोशल मीडिया आणि सततच्या माहितीच्या भडिमाराच्या युगात समर्थांनी सांगितलेल्या एकांताचे महत्त्व आणखी वाढले आहे. काही काळ मोबाईल आणि बाह्य जगापासून दूर राहून स्वतःच्या ध्येयावर, अभ्यासावर किंवा कामावर लक्ष केंद्रित करणे हीदेखील एक प्रकारची साधनाच आहे. **एकांत आपल्याला लोकांपासून दूर नेण्यासाठी नसून, स्वतःच्या अधिक जवळ नेण्यासाठी आहे.** त्यामुळे दररोज काही वेळ जाणीवपूर्वक एकांतासाठी दिला, तर मनःशांतीसोबतच एकाग्रता, आत्मविश्वास आणि कार्यक्षमताही वाढू शकते. खरं तर समर्थांनी एकांताचा मुख्य उपयोग आत्मज्ञानासाठी सांगितला आहे. आपण त्याचा उपयोग निदान भौतिक जगातील शांतीसाठी तरी करूयात.



६) समर्थ माणसं, समर्थ संस्था !

असे म्हणतात की आयुष्यभर विद्यार्थी बनून राहणे हे आपल्या यशाचे गमक आहे. अर्थात विद्यार्थी म्हणलं की रोज अभ्यास करणं आलं , नवनवीन विषय शिकणं आलं , गृहपाठ आला , शिस्त आली. आपल्या आजूबाजूला असे आयुष्यभर विद्यार्थी राहणारे अनेकजण असतात. बारकाईने आणि डोळसपणे पाहिलं तर आपल्याला ते नक्कीच दिसू शकतात.

ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती आयुष्यभरासाठी शिकत राहू शकते त्याप्रमाणे एखादी संस्था देखील अविरतपणे शिकत राहू शकते. अशा संस्थेस "लर्निंग ऑर्गनायझेशन" अर्थात शिकणारी संस्था म्हणतात. कोणतीही संस्था मग ती कॉर्पोरेट क्षेत्रातील असो , शिक्षण क्षेत्रातील असो , सामाजिक क्षेत्रातील असो , कालानुरूप होणारे बदल अंगीकृत करण्यासाठी सतत शिकत राहणे प्रत्येक संस्थेस आवश्यक असते . अर्थात संस्था म्हणजे इमारत किंवा जागा नव्हे तर तिथे काम करणाऱ्या व्यक्ती .त्यामुळे संस्थेने शिकत रहायचे याचाच अर्थ लोक शिकत राहिले पाहिजेत.अशा संस्थांची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे असते.

१. सुसंगत विचारांची आणि दीर्घकालीन परिणामांचा विचार करण्याची सवय.

शिकणाऱ्या संस्थेतील सर्वजण एकाच दिशेने विचार करणारे हवेत आणि त्यांचे विचार एकमेकांशी सुसंगत असले पाहिजेत. शिकणाऱ्या संस्थेत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात . संस्थेत रुजू होणारे लोक निवडतानाच ही काळजी घेतल्यास पुढील मार्ग सोपा होतो. मग ते उचपदस्थ अधिकारी असोत किंवा साधे कर्मचारी असोत. सर्वजण एकाच दिशेने जाणारे हवेत, सर्वांनी एकाच दिशेने विचार केल्यास वेळ पैसे आणि परिश्रम यांची बचत होऊन योग्य परिणाम साधता येतो. सुसंगत विचारांचा आणखी एक पैलू म्हणजे सर्वांनी दीर्घकालीन विचार करणे. केवळ तात्पुरत्या परिणामांचा विचार करून निर्णय

घेतल्यास ते अल्पजीवी ठरतात. या उलट दीर्घकालीन परिणामांचा विचार करून त्यानुसार निर्णय घेतल्यास संस्थेसाठी ते योग्य ठरते. उदाहरणार्थ, एखाद्या कंपनीने व्यवसायाचे नियोजन करताना केवळ पुढील तीन महिन्यांचा विचार न करता पाच वर्षांचा किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचा विचार केल्यास होणारे नियोजन योग्य होते. या ठिकाणी समर्थांचे " म्हणौन असावी दीर्घ सूचना| अखंड करावी चाळणा | पुढील होणार अनुमाना| आणून सोडावें " हे वचन आठवते.

२. संस्थेची उद्दिष्टे आणि वैयक्तिक उद्दिष्टे

शिकणाऱ्या संस्थेत संस्थेचे उद्दिष्ट आणि संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक उद्दिष्ट यांचा मेळ साधलेला असतो. वैयक्तिक उद्दिष्ट जर संस्थेच्या उद्दिष्टाच्या विरुद्ध दिशेने जाणारे असेल तर संस्थेच्या कार्यपद्धतीत अडचणी निर्माण होऊ शकतात. एकाच विचाराने आणि उद्दिष्टाने झपाटलेली टीम अशक्य ध्येय आवाक्यात आणू शकते. खेळातही आपण हे पाहतो. क्रिकेटच्या संघातील सर्व खेळाडू विजयाच्या इर्षेने झपाटलेले असतील तर असा संघ एखाद्या ताकदवान संघाला देखील धूळ चारु शकतो याउलट वैयक्तिक कामगिरी आणि वैयक्तिक विक्रमावर लक्ष ठेवून सांघिक यशाला दुय्यम लेखणारे खेळाडू संघात असतील तर असा संघ कमकुवत संघाकडून सुद्धा पराभूत होऊ शकते. एकाच ध्येयाने झपाटलेल्या सदस्यांच्या

सहभागाने संस्थेत एक प्रकारची अदृश्य सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि अशी संस्था यशस्वी होते. याचा आणखी एक पैलू म्हणजे योग्य व्यक्तीला योग्य ते काम दिले जाणे. अन्यथा नावडतीचे काम मिळाले किंवा कुवतीबाहेरचे काम मिळाले तर ते टाळण्याकडे बहुतेकांचा कल असतो. यासाठी संस्थेच्या प्रमुखाने सर्वांची कुवत पाहूनच काम द्यावे. म्हणून समर्थ म्हणतात, "अधिकार पाहोन कार्य सांगणे| सापेक्ष पाहोन विश्वास धरणे| आपला मगज राखणे । काहीतरी|"

३. कुशलता

ज्या संस्थेत एखाद्या क्षेत्रात पारंगत असलेले लोक असतात अशा संस्थेची भरभराट होते. यासाठी संस्थेने प्रत्येक व्यक्तीला एखाद्या क्षेत्रात पारंगत होण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. संस्थेतील वातावरण अशा लोकांसाठी पोषक असावे. अर्थात प्रत्येक व्यक्तीने देखील आपले आवडीचे क्षेत्र निवडून त्यात निपुणता आणली पाहिजे. त्याने कार्यालयातील कामकाजातील एखाद्या क्षेत्रात निपुणता मिळण्यापूर्वी प्रामुख्याने तीन गोष्टींचा विचार करायला हवा . सर्वात महत्वाचे म्हणजे असे क्षेत्र आपल्या आवडीचे असावे. केवळ एखाद्या कामाला मागणी अधिक आहे किंवा तिथे अधिक मोबदला मिळतो म्हणून ते काम निवडू नये. दुसरी गोष्ट म्हणजे त्या कामकाजाच्या अनुषंगाने येणाऱ्या ताणतणावांचा सामना करण्याची तयारी ठेवायला

हवी. उदाहरणार्थ कार्यालयातील हिशोब ठेवण्याचे क्षेत्र निवडणाऱ्याने वेगवेगळे कर, त्यांची माहिती, हिशोबाच्या रेकॉर्डचे ऑडिट यासारख्या अनुषंगिक गोष्टींची माहिती करून घ्यायला हवी. वैयक्तिक निपुणता मिळवण्यातील तिसरा मुद्दा म्हणजे आपण निवडलेल्या क्षेत्रात शंभर टक्के झोकून देण्याची तयारी अशा व्यक्तीची असावी. अर्थात यासाठी सतत प्रयत्न करत राहिले पाहिजे. केवळ कल्पनाविलास करणाऱ्या आणि आळसात लोळणाऱ्या व्यक्तीचे हे काम नव्हे. नाहीतर समर्थ म्हणतात त्याप्रमाणे साहेबकामास नाहीं गेला । गृहींच सुरवडोन बैसला । तरी साहेब कुटील तयाला । पाहाती लोक ॥ म्हणजेच कामावर न जात चैनीत राहणाऱ्या व्यक्तीला त्याचा फटका बसतोच. ज्या संस्थेत अशा आळशी लोकांचा अधिक भरणा असतो ती संस्था कधीही ' शिकणारी संस्था म्हणून नावारूपाला येऊ शकत नाही.

४. दृष्टीकोनात सकारात्मक बदल –

शिकणाऱ्या संस्थेचे आणखी एक वैशिष्ठय म्हणजे तेथील लोकांचा सर्वच गोष्टींकडे बघायचा दृष्टिकोन सकारात्मक असतो. काही कारणाने जर संस्थेत नकारात्मक ऊर्जेचा वावर असेल तर प्रयत्नपूर्वक उपाययोजना करून सकारात्मक वातावरण आणण्याचा प्रयत्न केला जातो. आजूबाजूच्या वातावरणामुळे काही गोष्टींकडे कायमच नकारात्मक विचाराने बघण्याची आपल्याला सवय असते उदाहरणार्थ कारखान्यातील कमी उत्पादकता असलेले सर्वच कामगार आळशी

असतात हा समज. तसेच परीक्षेत नापास होणाऱ्या प्रत्येक मुलाचा बुद्धयांक कमी असतो हा समज. परंतु अशा घटनांकडे सकारात्मक नजरेने पाहिल्यास त्यातून मार्ग निघू शकतो.

शिकणाऱ्या संस्थेच्या या वैशिष्ट्यामुळे अशी संस्था इतर संस्थांपेक्षा वेगळी ठरते. साधारणतः आपले जुने अनुभव आणि समज यानुसार प्रत्येक व्यक्ती पुढ्यात येणाऱ्या घटनेचा अर्थ लावत असते. परंतु शिकणारी संस्था अशा जुन्या समजुतींना आव्हान देयला शिकवते ज्यातून नवीन सकारात्मक दृष्टिकोन तयार होऊ शकतो.

५. विचारांची देवाणघेवाण

शिकणाऱ्या संस्थेतील सर्व लोक आपापल्या विचारांची देवाणघेवाण विनाअडथळा करतात. अशा प्रकारची विचारांची देवाणघेवाण ही संस्थेतील लोकांना प्रोत्साहन मिळण्यासाठी अत्यावश्यक असते कारण त्यामुळे एकजिनसी वातावरण तयार होऊन ननवीन गोष्टी शिकण्याची ऊर्जा मिळत रहाते. विचारांची देवाणघेवाण होण्यासाठी संस्थेतील उच्चपदस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक ठरते. उच्च पदस्थांनी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी विचारांची देवाणघेवाण करण्याची पद्धत सुरु केल्यास विचारांच्या देवाणघेवाणीची सवय हळूहळू प्रत्येकाला लागू शकते.

६. सांघिक कामगिरी.

शिकणाऱ्या संस्थेतील वातावरण सांघिक कामगिरीला पूरक असते. संस्थेतील लोकांमध्ये स्पर्धा असली तरी ती निकोप हवी. वेळप्रसंगी एकमेकांना मदत करणारे सभासद असणे हे तर संस्थेचे भूषणच. एकमेकांना मदत करताना सांघिक कामगिरी उंचावणे हे एकमेव उद्दिष्ट असावे. अशा वातावरणामुळे वैयक्तिक कामगिरीचे अवास्तव स्तोम न माजवता सांघिक यशाला महत्व दिले जाते.

शिकणाऱ्या संस्थेची वर नमूद केलेली वैशिष्टये पाहिल्यास त्यामध्ये असे लक्षात येते की संस्थेच्या प्रमुखाची त्यामध्ये महत्वाची भूमिका असते. तो निस्पृह असावा, स्वार्थी नसावा तसेच प्रसिद्धीला हपापलेला नसावा. त्याने सतत कार्यतत्पर असायला हवे. त्याने आपल्या संस्थेत लोक घेण्याआधी त्यांची योग्य पारख करून घ्यायला हवी. अशा अधिकाऱ्याच्या पुढाकाराने कोणतीही संस्था ही शिकणारी संस्था होण्यास मदत होते. अर्थात अशा अधिकाऱ्याने केवळ स्वतःसाठी हे विचार मर्यादित न ठेवता महंतें महंत करावे या उक्तीप्रमाणे आपल्या विचारांचे लोक संस्थेत तयार केल्यास शिकत राहण्याची वृत्ती ही त्या संस्थेशी जीवनशैली होण्यास मदत होते. अशा पद्धतीने शिकणाऱ्या संस्थेतून शिकलेले लोक तयार होऊन दुसऱ्या संस्थेची जबाबदारी घेऊ शकतात आणि अशा संस्थेचा कायापालट शिकणाऱ्या संस्थेत होऊ शकतो. यासाठी संस्थेच्या प्रमुखाने स्वतःकडील ज्ञान आणि माहिती हि सर्वांसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे. थोडक्यात समर्थ सांगतात त्याप्रमाणे जे जे आपणासी ठावे / ते ते इतरांशी सांगावे / शहाणे करुन सोडावे / सकळजना / हा दृष्टिकोन ठेवावा.

समर्थांनी स्थापन केलेले मठ आणि त्यांचे व्यवस्थापन याविषयी समर्थांचा दृष्टिकोन पाहिल्यास शिकणाऱ्या संस्थेची बहुतेक सर्व वैशिष्ट्यांचा विचार त्यांनी शेकडो वर्षे आधीच करून ठेवल्याचे लक्षात येते. समर्थांनी त्या काळी शेकडो मठ स्थापन केले आणि तरुण मुलांना समर्थ संप्रदायाची दीक्षा दिली. या मठांमध्ये एखाद्या शिष्याची महंतपदी नियुक्ती करताना त्या शिष्याची कसून परीक्षा घेतली जात असे. समर्थांना शिष्याकडून कठोर साधनेची आणि अभ्यासाची अपेक्षा असे. दासबोधाचे नुसते पारायण करून भागत नव्हते तर दासबोध समजावून घेण्यावर समर्थांचा भर असे. उपलब्ध संदर्भानुसार असे स्पष्ट होते की शिष्याची परीक्षा घेण्याची समर्थांची पद्धत देखील वैशिष्ठयपूर्ण होती. समर्थ त्या शिष्याकडून त्याने लिहिलेली दासबोधाची पोथी मागवून घेत आणि पोथीची सर्व पाने विस्कळीत करत आणि मग शिष्याला सगळा दासबोध पुन्हा व्यवस्थित लावून ठेवायला सांगत. ज्या शिष्यांचा दासबोध कंठस्थ नसे त्यांना पोथी जुळवायला फार वेळ लागे. अशा शिष्याला महंत म्हणून किंवा मठपती पदी नियुक्त केले जात नसे.

मठाच्या महंतांच्या अंगी कोणते गुण असावेत याविषयीदेखील समर्थांनी तपशीलवार भाष्य केले आहे. दासबोधात महंत-लक्षण सांगताना समर्थ म्हणतात -

पुसों जाणे सांगों जाणे| अर्थांतर करूं जाणे |

सकळिकांचें राखों जाणे| समाधान ||

दीर्घ सूचना आधीं कळे| सावधपणें तर्क प्रबळे |

जाणजाणोनि निवळे| येथायोग्य ||

ऐसा जाणे जो समस्त| तोचि महंत बुद्धिमंत |

यावेगळें अंतवंत| सकळ कांहीं ||

आधींच सिकोन जो सिकवी| तोचि पावे श्रेष्ठ पदवी |

गुंतल्या लोकांस उगवी| विवेकबळें ||

जयास येत्नचि आवडे| नाना प्रसंगीं पवाडे |

धीटपणें प्रगटे दडे| ऐसा नव्हे ||

सांकडीमधें वर्तों जाणे| उपाधीमधें मिळों जाणे |

अलिप्तपणें राखों जाणे| आपणासी ||

ज्या देशामध्ये शिकणाऱ्या संस्थांची आणि त्यामध्ये खऱ्या अर्थाने शिकणाऱ्या लोकांची संख्या वाढत राहते तो देश नक्कीच प्रगतीपथावर जातो यात शंका नाही.

७) समर्थ शिक्षक - काळाची गरज.

पुलंचे चितळे मास्तर ऐकताना आपल्याला आपल्या शिक्षकांची आठवण येते. प्रत्येकाच्या शालेय जीवनात असं तळमळीनं शिकवणारा एखादा तरी शिक्षक आलेला असतोच. विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे कल्याण करणे हेच त्या शिक्षकाचे ध्येय असते आणि त्यासाठी तो सातत्याने झटत असतो. कधी तो मुलांना आंजारून - गोंजारून एखादी गोष्ट विनवणी करून सांगतो तर कधी वाईट गोष्टीची

भीती दाखवून त्यापासून विद्यार्थ्यांना तो परावृत्त करतो तर वेळप्रसंगी चिडून तो एखादी गोष्ट विद्यार्थ्यांच्या गळी उतरवतो.

समर्थांचे वांग्मय पहिले तर त्यांच्यातील शिक्षक प्रकर्षाने लक्षात येतो. एका उत्तम शिक्षकाच्या अंगी जे सद्गुण आवश्यक असतात ते सर्व गुण समर्थांच्या वाङ्मयात ठिकठिकाणी दिसतात. समर्थांना त्यांना चांगलं माहित आहे की विद्यार्थ्यांचं मन हेच त्यांच्या प्रगतीला किंवा अधोगतीला कारणीभूत असतं त्यामुळं मनालाच उपदेश करणं आवश्यक आहे. म्हणूनच ते ' मना सज्जना ' अशी साद घालून मनाचे श्लोक सांगतात. त्यातही गंमत अशी की मनाच्या श्लोकात ते मनाला उपदेश करताना ते 'जावे' असा उपदेश करतात. (उदाहरणार्थ -'मना सज्जना भक्ती पंथेची जावे"). कोणत्याही श्लोकामध्ये ते मनाला आदेश देत नाहीत. विनोदाने सांगायचे तर समर्थांनी जर 'मना सज्जना भक्ती पंथेची जावे' म्हणायच्या ऐवजी समर्थ जर 'मना सज्जना भक्ती पंथेची जाच' असा आदेश दिला असता तर लोकांना कदाचित त्याचा 'जाच' झाला असता.

आत्ताच्या काळातील विद्यार्थ्यांना तर कोणत्याही प्रकारचा उपदेश आवडत नाही तर त्यांना मित्राच्या नात्याने दिलेला सल्ला आवडतो. विशेषतः सध्याची जनरेशन झेड आणि आता येऊ घातलेली जनरेशन बीटा यांच्यासाठी तर हा फरक अधिकच ठळकपणे लक्षात येतो.

समर्थ कधी **' मना सांग पां रावणा काय झाले '** असं सांगून रावणाचे उदाहरण देऊन दुष्ट वासना ठेवली तर नुकसान कसे होते हे

सोदाहरण स्पष्ट करतात तर कधी चिडून ते ' भवाच्या भये काय भीतोस लंडी ' असा प्रश्न विचारतात तर कधी **'नुपेक्षी कदा रामदासाभिमानी'** असे सांगून आपला आत्मविश्वास वाढवतात.

उत्तम शिक्षकाकडे प्रामुख्याने तीन गुण आवश्यक असतात त्यापैकी पहिला गुण म्हणजे अवघड गोष्टी सोप्या करून सांगणे. समर्थांच्या वांग्मयात कितीतरी अवघड गोष्टी सोप्या शब्दात सांगितल्या आहेत. रोजच्या जीवनातील उदाहरणे देत एखादा अवघड विषय आपल्याला अगदी सहजपणे समजावून सांगतात. उदाहरणार्थ आपला व्यवसाय जाणून घेऊन तो अखंड सावधानतेने करावा हे सांगताना समर्थ **पर्नाळी पाहून उचले, विवेके जग चाले | मनुष्य होऊन भ्रमले, यांसी काय म्हणावे |** या श्लोकातून पर्नाळीचं एकदम साधं सोपं उदाहरण देऊन मनुष्याला मार्गदर्शन करतात.

उत्तम शिक्षकाचा दुसरा गुण म्हणजे विद्यार्थ्यांविषयी वाटणारी तळमळ ! समर्थांच्या वाङ्मयातून ही तळमळ सातत्याने दिसते. लोकांनी चांगले वागावे, त्यांचे कल्याण व्हावे, काही लोक चुकत असतील तरी त्यांना माफ करावे अशा आशयाचे संदर्भ समर्थांच्या वांग्मयातून कायम येतात. समर्थांची **' कल्याणकरी रामराया '** ही जगाच्या कल्याणासाठी केलेली प्रार्थना याचे उत्तम उदाहरण आहे.

उत्तम शिक्षकाचा तिसरा गुण म्हणजे शिक्षक हा स्वतः विद्यार्थांसाठी एक आदर्श वाटला पाहिजे. म्हणजे शिक्षकाने त्याच्या रोजच्या वागण्यातून विद्यार्थ्यांसमोर उत्तम जीवनाचा वस्तुपाठ ठेवला

पाहिजे. समर्थानी त्यांच्या वाङ्मयात जे जे लिहले त्याप्रमाणेच ते वागले त्यामुळे ते याबाबतीत आदर्श ठरतात. अशा शिक्षकाला राग आला तरी तो गळ्याच्या वरचा राग असावा, तो राग हृदयातून आलेला नसावा. म्हणजेच तो राग वरवरचा असावा आणि त्या रागातून विद्यार्थ्यांचे कल्याण व्हावे हा एकच हेतू असावा. समर्थांचा राग हा असा दिसतो. **भवाच्या भये काय भीतोस लंडी।** असे त्यांनी चिडून विचारले तरी पुढील क्षणाला ते ' अरे तुझ्यामागे रघुनायकासारखा स्वामी आहे जो तुझी कधीच उपेक्षा करणार नाही ' असे सांगून आपल्या मनाला आधार सुद्धा देतात. असे समर्थ केवळ अध्यात्मातच आपल्याला मार्गदर्शन करतात असं नाही तर आजच्या मॉडर्न लाईफमध्ये देखील 'समर्थ शिक्षक' होऊन मार्गदर्शन करतात. काय म्हणालात ? विश्वास बसत नाही ? तर मग पुढील लेख नक्की वाचा..


मोक्ष / आत्म-विस्तार
आत्म-साक्षात्कार
स्वनिष्ठा
सामाजिक व प्रेम
अन्न, वस्त्र, निवारा, सुरक्षा
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥
दासबोध:
१. ज्ञानयोग
२. भक्तियोग
३. कर्मयोग
४. वैराग्य
५. विवेक
६. गुरु-शिष्य संवाद
Sarch

८) पोटापासून परमात्म्यापर्यंत: मॅस्लो आणि दासबोध.

अब्राहम मॅस्लो हे अमेरिकन मानसशास्त्रज्ञ आणि विचारवंत होते. वर्ष १९०८ ते वर्ष १९७० हा त्यांच्या कार्याचा कालावधी होता. मनुष्याच्या गरजा कशा बदलत जातात किंवा खरं तर कशा बदलत गेल्या पाहिजेत याविषयी त्यांनी मांडलेला सिद्धांत त्याकाळात मॅस्लो थेअरी या नावाने जगभरात प्रसिद्ध झाला होता. या सिद्धांताचा उपयोग आजही मनुष्यबळ व्यवस्थापन, शिक्षण, मानसशास्त्र, नेतृत्व, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट या क्षेत्रांत होतो. त्यांनी माणसाच्या गरजा एका पिरॅमिडसारख्या टप्प्यांमध्ये समजावून सांगितल्या. ते म्हणतात की सामान्य मनुष्याच्या गरजा सुरुवातीला शारीरिक पातळीवर आणि सुरक्षिततेच्या असतात. जसजसा मनुष्य प्रगल्भ होतो तसतशा त्यांच्या गरजांचे स्वरूप सामाजिक होते. त्यानंतर त्याला मान आणि सन्मान हवा असतो. या सर्व गरजा भागवताना त्याची दमछाक होते आणि आपली खरी गरज ही 'आत्मसिद्धी' आहे हे सरतेशेवटी त्याच्या लक्षात येते. कॉर्पोरेट जगात या थिअरीचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. कंपनीत नव्याने रुजू झालेल्या व्यक्तीला पगार आणि नोकरीतील सुरक्षितता महत्वाची वाटते. काही काळानंतर सहकाऱ्यांनी माझ्यासोबत मैत्री करावी असे त्याला वाटू लागते. त्यानंतर मला कंपनीत मान मिळावा असे त्याला वाटू लागते आणि सरतेशेवटी नवीन

आव्हान स्वीकारून त्यात स्वतःला सिद्ध करण्यात त्याला समाधान वाटू लागते. कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीचा मॅस्लो थेअरीशी कधीनाकधी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंध येतोच.

महाविद्यालयात शिक्षण घेताना मॅस्लो थेअरीने मी खूप प्रभावित झालो होतो. त्याच दरम्यान योगायोगाने श्रीमत दासबोध वाचनात आला. एकामागून एक दशक वाचतावाचता पाचव्या दशकातील सातव्या समासापाशी आलो आणि थबकलो. या दशकातील समास क्रमांक सात ते दहा वाचले आणि मॅस्लो थेअरी आठवली. या समासांमध्ये समर्थांनी मॅस्लो थेअरीत सांगितलेले मुद्धे त्यापूर्वीच अंदाजे तीनशे वर्षे मांडले आहेत आणि ते देखील अधिक प्रगल्भपणे ! मॅस्लो थेअरी प्रामुख्याने कॉर्पोरेट क्षेत्रात लागू पडते तर दासबोधातील हे समास जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्शून जातात. मॅस्लो थिअरीचा प्रवास अधिक भौतिक गोष्टीकडून कमी भौतिक गोष्टींकडे वाटचाल करतो तर दासबोधातील बद्ध ते सिद्ध हा प्रवास म्हणजे भोगवादापासून वैराग्याकडे जाणारा प्रवास आहे. बद्ध, मुमुक्षु, साधक आणि सिद्ध या चारही अवस्था समर्थ अगदी नेमक्या शब्दात सांगतात. बद्ध व्यक्तीच्या चित्तात कायम द्रव्य म्हणजे संपत्ती असते. तेच त्याचा प्राण आणि तोच त्याचा जीव. रात्रंदिवस त्याला फक्त संपत्तीची चिंता लागलेली असते आणि ती मिळावी म्हणून तो धडपडत असतो. यापलीकडे काही जग असेल याची त्याला जाणीवदेखील नसते. काही काळानंतर मात्र त्याला त्याच्या चुकीची जाणीव होते आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी तो प्रयत्न करू लागतो. आयुष्यातील इतके दिवस

मी वाया घालवले याची जाणीव त्याला होऊ लागते आणि आता काहीतरी परोपकार करावा आणि जीवन सार्थकी लावावे असं त्याला वाटू लागते. तो ईश्वरी मार्गावर चालण्याची इच्छा बाळगतो, पण अजून साधनेत पूर्णपणे उतरलेला नसतो. मोक्षाची तीव्र इच्छा बाळगणारा असा हा मनुष्य म्हणजे मुमुक्षु . कालांतराने मात्र त्याचे साधक अवस्थेत रूपांतर होते आणि तो आतून 'स्ट्रॉंग' होतो. त्याच्या या अवस्थेचे वर्णन समर्थ भवभयासि भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें । मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें अशा शब्दात करतात. जो मुमुक्षूच्या इच्छेला प्रत्यक्षात आणण्यासाठी साधना करतो, तो 'साधक' होय. असा साधक सरतेशेवटी साधनेच्या मार्गावर अंतिम ध्येय गाठतो आणि 'सिद्ध' होतो. सिद्ध व्यक्ती आत्मज्ञान प्राप्त करून सर्व बंधनांपासून मुक्त झालेली असते. **देहातीतांचीं लक्षणें । काय म्हणोनि सांगावीं ॥ जें लक्षवेना चक्षूंसी । त्याचीं लक्षणें सांगावीं कैसीं ।निर्मळ वस्तु सिद्ध त्यासी । लक्षणें कैंसीं ॥** असं म्हणत समर्थ सांगतात की ज्याची देहबुद्धी मेलेली आहे त्याच्या देहाचे वर्णन कसे करावे , ज्याचे सद्गुण उघड्या डोळ्यांना दिसू शकत नाहीत त्याच्या सद्गुणांविषयी काय बोलावे !

मॅस्लो थेअरीचे कॉर्पोरेट क्षेत्रात मोठे महत्व आहे याविषयी दुमत नाहीए परंतु हाच विचार अधिक व्यापक अर्थाने शेकडो वर्षे आधीच सांगून ठेवला आहे हे देखील अशावेळी विसरू नये. समर्थांनी सांगितलेली ही थेअरी कॉर्पोरेट क्षेत्रात लागू पडतेच शिवाय जीवनाच्या इतर क्षेत्रातही तितक्याच प्रभावीपणे अमलात आणता येते.



९) कॉनफ्लिक्ट मॅनेजमेंट.

कॉर्पोरेट जगात कॉनफ्लिक्टचे मॅनेजमेंट करणे म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये सुरु असलेल्या संघर्षाचे व्यवस्थापन करणे हे मोठे काम झाले आहे. विविध कारणांमुळे व्यक्तींमध्ये संघर्ष होत असतात. यातील सर्वात प्रमुख कारण म्हणजे संवादाचा अभाव ! संवादाची अत्याधुनिक साधने उपलब्ध झाली असली तरी लोकांमधील संवादाची दरी वाढत आहे. कॉर्पोरेट क्षेत्रात तर ही समस्या अधिकच जटिल झाली

आहे. एकतर तिथे उच्चशिक्षित लोकांची संख्या अधिक आणि त्यात एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन देखील वेगवेगळा. याचा एकत्रित परिणाम म्हणजे तिथे एखाद्या मुद्द्यावर एकमत होणं खूप अवघड जातं. त्यात प्रत्येकाचा अहंकार आडवा आल्याने अनावश्यक वाद आणि भांडणे वाढतात. या संघर्षाचे स्वरूप देखील वेगवेगळे असते . काही वेळा हा संघर्ष दोन व्यक्तीमध्ये असतो तर काही वेळा दोन गटांमध्ये असतो. काहीवेळा हा संघर्ष दोन पातळ्यांवरील लोंकांमध्ये असतो, जसं की व्यवस्थापन आणि कर्मचारी वर्गातील मतभेद !

हा संघर्ष वेळीच योग्य प्रकारे हाताळला नाही तर त्याचे दुष्परिणाम संबंधित व्यक्तीला आणि संस्थेला भोगावे लागतात. संघर्षाचा पहिला दृश्य परिणाम म्हणजे चांगले लोक अशी संस्था सोडून जातात. हा संघर्ष विकोपाला जातो तेव्हा चांगल्या लोकांची टीम एकाचवेळी बाहेर पडते आणि तिथून संस्थेच्या अधोगतीला सुरुवात होते. अर्थात हा दृश्य परिणाम हाताळायला तुलनेने सोपा असतो कारण तो मोजता येतो. परंतु संघर्षाचा अदृश्य परिणाम म्हणजे लोकांचे मनोधैर्य ढासळते आणि त्यांच्यांमधील दुरावा वाढतो. हा परिणाम लक्षात येणे अवघड असते कारण तो मोजता येत नाही. परंतु त्याचे नकारात्मक परिणाम खोलवर होतात.

अलीकडील काळात कॉर्पोरेट क्षेत्रातील संघर्ष हाताळण्याची अनेक तंत्रे उपलब्ध झाली आहेत. या तंत्रांचे श्रेय बऱ्याच वेळा पाश्चिमात्य देशातील या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना दिले जाते. आपल्याला आश्चर्य वाटेल पण साडेतीनशे वर्षांपूर्वी समर्थ रामदास

स्वामींनी मनाच्या श्लोकांमध्ये या संघर्षाविषयी चर्चा केली आहे. मनाच्या श्लोकांमधील **श्लोक क्रमांक १०८ ते ११२** या श्लोकांमध्ये **'तुटे वाद संवाद तो हितकारी'** म्हणत समर्थांनी सर्वच स्तरावरील संघर्षावर तोडगा सुचविला आहे. समर्थांचा वैशिष्ठय म्हणजे ते इतर कोणालाही सल्ला न देता मनालाच सल्ला देतात . यासाठी समर्थ सर्वप्रथम **मना सर्वदा सज्जनाचेनि योगें** म्हणत मनाला पहिला सल्ला देतात की कायम सज्जन व्यक्तींच्या संगतीत रहा आणि चांगले काम करीत रहा. हे करत असताना वाचाळपणा म्हणजे 'गॉसिपिंग' अजिबात करू नकोस. ही पहिली पायरी पार केली की पुढची पायरी उत्तीर्ण होण्यासाठी समर्थ सांगतात की हे मना काहीवेळा तुला लोकांचे मत पटणार नाही. अशावेळी लोकांची वादविवाद न करता जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा, जनीं वादसंवाद सूखे करावा हा मार्ग आचरावा. म्हणजे लोकांचे मत जरी पटले नाही तरी त्यांच्यासोबत वादावादी न करता त्यांच्यासोबत व्यवहार करताना मध्यम मार्ग निवडावा. यापुढे मात्र समर्थ थोडं कठोर होऊन मनाला सांगतात की तुझा लोकांबरोबर संघर्ष होण्याचे मुख्य कारण म्हणजे तुझा अहंकार ! जोपर्यंत हा अहंकार तू सोडून देत नाहीस तोपर्यंत या संघर्षमय विकारामधून तू बाहेर पडणार नाहीस हे सांगताना समर्थ म्हणतात **अहंतागुणे वाद नाना विकारी !**

अर्थात काहीवेळा आपल्याला थोडी कणखर भूमिका घेऊन संस्थेच्या भल्यासाठी वाईटपणा घेऊन सत्य बोलावेच लागते असे सांगून समर्थ म्हणतात की **हिताकारणे बोलणे सत्य आहे।**

हिताकारणे सर्व शोधुनि पाहें॥ म्हणजे आपण ज्या संस्थेसाठी काम करत असतो त्या संस्थेच्या मुळावर जर कोणी घाव घालत असेल तर मात्र आपण बंड करून उभे राहिले पाहिजे.

सरतेशेवटी समर्थ पुन्हा एकदा **जनीं सांगतां ऐकता जन्म गेला। परी वादवेवाद तैसाचि ठेला** असं म्हणत सांगतात की या वादविवादात लोकांचे आयुष्य जाते तरीदेखील तो वाद तसाच राहतो मग अशा वेळी तू विनाकारण त्याच विषयांवर पुन्हा कशासाठी काथ्याकूट करत बसला आहेस ?

पाशात्य देशातील विद्वान सांगतात की संघर्ष हाताळण्यासाठी वेगवेगळी तंत्रे वापरा. दुसऱ्या बाजूला समर्थ मात्र मनालाच उपदेश करून आपल्याकडून संघर्ष कमी करण्याचा सल्ला देतात. कारण समर्थांना माहित आहे की संघर्षाचे मूळ हे आपल्या मनात आहे त्यामुळे जोपर्यंत त्यावर आपण तोडगा शोधत नाही तोपर्यंत ही वरवरची वापरली जाणारी तंत्रे फारसी उपयोगाची नाहीत .त्यामुळेच त्यांनी चारशे वर्षांपूर्वी 'संघर्ष संपवा' असे न सांगता 'संघर्षाचे व्यवस्थापन करा' असा सल्ला दिला . आज तोच सल्ला कॉर्पोरेट क्षेत्रात कॉनफ्लिक्ट मॅनेजमेंट या नावाने प्रचलित आहे.

१०) दुसऱ्याची सावली, स्वतःचा मार्ग: जॉब शॅडोइंग आणि दासबोध.

कॉर्पोरेट क्षेत्रात जॉब शॅडोईन्ग या संकल्पनेला अलीकडे अधिकाधिक महत्व येऊ लागले आहे. यामध्ये एखाद्या ऑफिसमध्ये नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्याला त्याच्या वरिष्ठांसोबत वावरण्याची संधी मिळते. वरिष्ठांच्या सावलीसारखं होऊन राहण्याची संधी त्या नव्या व्यक्तीला मिळते म्हणूनच या संकल्पनेचं नाव शॅडोईन्ग असं आहे. अलीकडे ही संकल्पना महाविद्यालयात देखील येऊ लागली आहे. दोन सत्रांमध्ये किंवा उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना मोठमोठ्या

कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसोबत कामाच्या ठिकाणी वावरण्याची संधी या विद्यार्थ्यांना मिळते.

जॉब शॅडोइंगची संकल्पना शोधण्याचे श्रेय एका व्यक्तीला देता येणार नाही. या संकल्पनेची सुरुवात १९७० च्या दशकात अमेरिकेत झाली. जॉब शॅडोइंगची माहिती सर्वप्रथम १९७९ मध्ये हार्टफोर्ड करंट या अमेरिकन वर्तमानपत्रात आली आणि तिथून ती अमेरिकेत आणि इतर देशातील कॉर्पोरेट क्षेत्रात प्रसिद्ध झाली. कालांतराने जॉब शॅडोइंग हे नोकरीच्या वेळी शिकण्याच्या आणि करिअरचा एक प्रकार म्हणून विकसित झाले, ज्यामुळे व्यक्तींना त्यांच्या कामाच्या वातावरणात व्यावसायिकांचे निरीक्षण करण्याचा एक प्रॅक्टिकल मार्ग म्हणून लोकप्रियता मिळाली. जर एखाद्या विद्यार्थ्याला डॉक्टर व्हायचे असेल, तर तो एखाद्या डॉक्टरसोबत हॉस्पिटलमध्ये काही दिवस राहून त्यांचे काम पाहतो, रुग्णांशी संवाद कसा करतात, निदान कसे करतात इत्यादी गोष्टी शिकतो. जर एखाद्या विद्यार्थाला चार्टर्ड अकाऊंटंट व्हायचे असेल तर तो प्रशिक्षित चार्टर्ड अकाऊंटंटच्या ऑफिसमध्ये आर्टिकलशिप करतो.

आपल्याला आश्चर्य वाटेल पण समर्थ रामदास स्वामींनी चारशे वर्षांपूर्वी जॉब शॅडोईन्ग संकल्पनेचा विचार करून ठेवला होता. दासबोधातील सर्वज्ञसंगनिरूपण या समासात ते याविषयी सविस्तर मार्गदर्शन करतात. समासाच्या सुरुवातीलाच ते **नेणपणें जालें तें जालें । जालें तें होऊन गेलें ।** असं म्हणतात म्हणजे अजाणतेपणाने

आत्तापर्यंत जे झाले ते झाले. झाले-गेले होऊन गेले, पण आता तरी आपण जाणतेपणाने वागले पाहिजे. यानंतर ते आपापल्या क्षेत्रातील सिनियर म्हणजेच जाणत्या व्यक्तीकडून कायकाय शिकावे याची यादीच सादर करतात. सर्वप्रथम अशा जाणत्या व्यक्तीच्या सानिध्यात राहण्याचा सतत प्रयत्न करावा आणि आपल्या परीने त्याची सेवा करावी असं ते सांगतात. आजच्या काळातील जॉब शॅडोईन्ग या संकल्पनेत देखील नेमकं हेच सांगितलं आहे.

त्यानंतर समर्थ सांगतात की लिहणे -वाचणे या गोष्टी सुद्धा जाणत्याकडून शिकून घ्याव्यात. म्हणजे अशा व्यक्ती वाचन कधी आणि कोणत्या गोष्टींचे करतात, लिहताना कशा पद्धतीने लिहतात हे शिकून घ्यावे. हा उपदेश केवळ शाळा कॉलेजात जाणाऱ्या विद्यार्थ्यांपुरता मर्यादित आहे असं नव्हे तर आपल्या अंगी संगीत गायन यासारखी एखादी कला असावी असं ज्याला वाटतं त्याने देखील त्या क्षेत्रातील जाणकार व्यक्तीच्या सानिध्यात रहावे हे सांगताना समर्थ म्हणतात **जाणत्याचे संगतीनें भजावें । जाणत्याचे संगतीनें झिजावें । जाणत्याचे संगतीनें रिझावें । विवरविवरों ॥** एवढंच नव्हे तर औषध घेताना देखील अशा जाणकार माणसाचा सल्ला घ्यावा असं समर्थ सांगतात. कॉर्पोरेट क्षेत्रात वरिष्ठ पदावर काम करणारे लोक कसे वागतात याचा अभ्यास नवख्या व्यक्तीने करणे आवश्यक आहे. याविषयी तंतोतंत मार्गदर्शन करताना समर्थ सांगतात -**जाणता बोलेले तैसें बोलावें । जाणता सांगेल तैसें चालावें । जाणत्याचें ध्यान घ्यावें । नाना प्रकरीं**

राजकारणात तर शॅडोईन्ग संकल्पनेला अन्यनसाधारण महत्व आहे. **जाणत्याचें धूर्तपण । जाणत्याचें राजकारण । जाणत्याचें निरूपण ।** ऐकत जावें असे सांगून समर्थ राजकारणातील जॉब शॅडोइंगचे महत्व स्पष्ट करतात.

सरतेशेवटी समर्थ सांगतात की परमेश्वर हा खरा जाणता आहे म्हणून त्याच्या संगतीत रहावे आणि त्याचे गुणगान करावे. त्याच्यासोबत संगत करून आणि त्याच्याबरोबर अखंड संवाद करून **परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद । तेणेंकरिता आनंद । उदंड होतो** अशी अवस्था आपण प्राप्त करून घेऊ शकतो.

‘नसे राम ते धाम सोडून द्यावे’

-समर्थ रामदास स्वामी

११) वर्क-लाईफ बॅलन्स आणि दासबोध: समतोल जीवनाचे सूत्र.

काही वर्षांपूर्वी आलेल्या “दूर देशी गेला बाबा, गेली कामावर आई, नीज दाटली डोळ्यांत, तरी घरी कोणी नाही आणि त्याचा दरम्यान आलेल्या 'कोमेजून निजलेली एक परी राणी, उतरले तोंड, डोळा सुकलेले पाणी ' या दोन गाण्यामध्ये वर्क लाईफ बॅलन्स या संकल्पनेचे दु:ख सामावलेले आहे. मोठमोठ्या कंपन्यांमध्ये उच्च पदावर काम करणाऱ्या व्यक्तींना ही समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. धकाधकीच्या आयुष्यात 'काम आणि कुटुंब' याची सांगड घालताना म्हणजेच ‘वर्क लाईफ बॅलन्स” करताना जवळपास प्रत्येकाचीच तारेवरची कसरत होत आहे. कामाचे वाढलेले तास आणि कामाचा ताण यामुळे ‘वर्क लाईफ बॅलन्स करणं अधिकच कठीण झालं आहे. हा एक प्रकारचा मानसिक आजारच आहे असं म्हणता येईल. या आजारामुळे ऑफिसमधील काम आणि कुटुंब यापैकी कशालाच न्याय देता येत नाही आणि मग चीडचीड, नैराश्य आणि त्यातून पुढे नात्यांमध्ये कुरुबुरी सुरु होतात आणि पुन्हा याचा परिणाम कामावर होतो. म्हणूनच ‘वर्क लाईफ बॅलन्स’ करणे अत्यंत आवश्यक आहे. एका सर्वेक्षणानुसार भारतातील ६७% लोक ऑफिसमध्ये नसताना देखील ऑफिसमधील कामाचा विचार करत असतात. यामुळे

नातेसंबंधांमधील तणाव वाढत चालला असून आयुष्यात समतोल राखणं कठीण जात आहे.

आपल्याला आश्चर्य वाटेल पण या समस्येचा विचार समर्थांनी चारशे वर्षांपूर्वीच केला होता आणि त्यावर उपाय देखील सुचवला होता बारकाईने पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की ऑफिसमधील काम आणि वैयक्तिक आयुष्य यात समतोल साधण्यामध्ये प्रामुख्याने तीन अडथळे येतात. पहिला अडथळा म्हणजे ऑफिसमधील कामाचे व्यसन लागणे. हे व्यसन असलेल्या लोकांपैकी काहीजणांना सतत कामाच्या व्यापात व्यग्र राहण्याची सवय लागलेली असते. अशा लोकांना समर्थ दासबोधातून पुढील उपदेश करतात - **कांहीं गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ । जेणेंकरितां विश्रांती वेळ । आपणासी फावे.** म्हणजे माणसाने काही काळ कामामध्ये खूप व्यस्त असावे तर शांत राहून काही काळ कंठीत जावा. असं केलं तरच आपल्याला खऱ्या मानसिक विश्रांतीसाठी वेळ मिळतो.

दुसरा अडथळा म्हणजे 'ऑफिसच्या कामाच्या प्रेमात पडणे '. अशा लोकांना कायम वाटत राहते की मी ऑफिसचे काम केले नाही तर ऑफिस बंद पडेल. विशेषतः उच्च पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वाटत राहते की मी जर माझ्या पदावरून दूर झालो तर ऑफिस बंद पडेल. आपण आयुष्यभर त्या उच्च पदावरच राहणार आहोत असा या लोकांचा समज असतो. त्या लोकांना समर्थ सांगतात **उपाधी कांहीं राहात नाहीं । समाधानायेवढें थोर नाहीं ।** म्हणजे

आपले पद कायमस्वरूपी आपल्यासोबत रहात नाही कारण कोणतेही पद हे शाश्वत नसते. त्याऐवजी काहीतरी शाश्वत गोष्टी मिळवण्याचा प्रयत्न करावा.

वर्क लाईफ बॅलन्स साधण्यात येणारा तिसरा आणि शेवटचा अडथळा म्हणजे ऑफिसच्या कामात' राम' न वाटणे. या ठिकाणी मात्र समर्थ थेट **'नसे राम ते धाम सोडून द्यावे'** असा मनाच्या श्लोकातून सल्ला देतात. आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकवेळी हा सल्ला अमलात आणणं अवघड असल्याने आपल्या कामात राम शोधावा म्हणजे आपोआप त्यात रस वाटू लागतो आणि एकदा कामात गोडी निर्माण झाली की त्याचं टेन्शन येऊन वैयक्तिक आयुष्य डिस्टर्ब् होत नाही.

वर्क लाईफ बॅलन्स या संकल्पनेचा आधुनिक कॉर्पोरेट जगात मोठा बोलबाला आहे. दूरदृष्टी असलेल्या समर्थांनी चारशे वर्षांपूर्वीच याचा विचार करून ठेवला होता हे लक्षात ठेवावं.

"महंते महंत करावे"
- समर्थ रामदास स्वामी

१२) दासबोधातील ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट !

मनुष्यबळाला 'ऍसेट' मानणे हा अलीकडील काळात पाश्चिमात्य देशातून आपल्याकडे आलेला विचार आहे असं आपल्याला वाटणं साहजिक आहे कारण सर्वत्र दाखले तसेच दिले जातात. समर्थांनी मात्र याचे महत्व चारशे वर्षांपूर्वीच जाणले होते. खरं तर समर्थांनी त्याही काळात एक पाऊल पुढे जाऊन या मनुष्यबळाचा उपयोग करून घेण्यासाठी मनुष्याला उपदेश करण्यासाठी त्याच्या मनाला उपदेश करण्याचे महत्व जाणले आणि त्यातूनच मनाच्या श्लोकांची निर्मिती झाली असावी. कोणत्याही मनुष्याला उपदेश करायचा असेल तर त्याच्या मनाचा विचार आधी करायला हवा असे समर्थ सांगतात. नेमके हेच आजच्या ह्युमन रिसोर्स अर्थात एचआर डिपार्टमेंटमध्ये दिसून येत नाही. एचआर डिपार्टमेंट आणि संस्थेतील इतर विभाग यातील महत्वाचा फरक म्हणजे इतर विभाग तांत्रिक कामे करत असतात तर एचआर डिपार्टमेंटला लोकांच्या भावना हाताळण्याचे अवघड काम असते. परंतु काही अपवाद वगळता, बहुतांश ठिकाणी ह्युमन रिसोर्स डिपार्टमेंट कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या अडचणींचे निवारण करण्यासाठी वरवर मलमपट्टी करताना दिसतात. अलीकडील काळात तर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) मदतीने या दुखण्यांवर इलाज करण्याचा विचार केला जाऊ लागला आहे. कामाचा झपाटा वाढविण्यासाठी आणि त्यातील अचूकता

वाढविण्यासाठी याचा नक्कीच उपयोग होत असला तरी त्यामुळे त्यातील 'ह्युमन टच' गायब झाला आहे. त्यामुळे ज्या कामात खरं तर मानवी चेहऱ्याची आवश्यकता असते असे काम कृत्रिम यंत्रणेद्वारे केले जाऊ लागले आहे. मोठमोठे इव्हेंट्स साजरे करणे, एकमेकांच्या वाढदिवसांना शुभेच्छा देणे, व्हाटसअँप ग्रुपवर संदेश पाठवणे यातून लोकांमधील सलोखा वाढविण्याचे प्रयत्न होत असले तरी प्रत्यक्षात मात्र लोकांमधील दरी वाढत चालली आहे. याची कारणे अनेक आहेत. सर्वात महत्वाची बाब म्हणजे वरिष्ठ आणि कनिष्ठ असा भेदभाव बहुतेक सर्वच संस्थांमध्ये आढळून येतो. काही संस्थांमध्ये नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्याला संस्थेची ओळख करून देण्यासाठी एचआर डिपार्टमेंटतर्फे इंडक्शन नावाचा औपचारिक कार्यक्रम केला जातो पण अनेकदा तो खूपच तांत्रिक प्रकारचा असतो. त्यामुळे यात त्या नवीन कर्मचाऱ्याचा बुजरेपणा कमी व्हायला फारसी मदत होत नाही. जुन्या कर्मचाऱ्यांना जी वेगवेगळी ट्रेनिंग दिली जातात त्यात देखील आपुलकीचा अभाव असल्यास त्या ट्रेनिंगचा फारसा उपयोग होत नाही. यामुळे हळूहळू एचआर डिपार्टमेंट आणि इतर कर्मचारी यांमध्ये एक प्रकारचा दुरावा निर्माण होऊ लागतो.

आत्ता हे सगळं आठवायचे कारण म्हणजे श्रीमत दासबोधामध्ये एक ओवी येते ती एचआर डिपार्टमेंटच्या वर दिलेल्या समस्येचे निराकरण करण्यास मदत करते. या ओवीत समर्थ म्हणतात महंते महंत करावे ! संस्थेमधील वरिष्ठ लोकांनी कनिष्ठ लोकांमधील गुण ओळखून त्याला प्रोत्साहन द्यायला हवे तरच भविष्यात चांगले नेतृत्व

निर्माण होऊ शकेल. आणि हेच खरं ह्युमन रिसोर्स डिपार्टमेंटचे काम आहे. केवळ कागदावर नियम करून हे होत नाही तर सर्वांना त्यासाठी राजी करणे हे अधिक महत्वाचे असतं. हे कसं साधायचं याविषयी देखील समर्थ मार्गदर्शन करतात. समर्थ पुढे सांगतात - **युक्तिबुद्धीनें भरावे !** म्हणजे संस्थेतील वरिष्ठ लोकांनी युक्तिप्रयुक्ती वापरून कनिष्ठ लोकांना ज्ञान द्यावे. या ठिकाणी समर्थांनी 'युक्तिबुद्धीने' हा अतिशय योग्य शब्द वापरला आहे. याचा अर्थ वरिष्ठ लोकांनी कनिष्ठांना प्रेमाने आणि आपुलकीने आणि वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरून ज्ञान द्यायचे आहे. हे करत असताना कोठेही अहंकाराला थारा देऊ नये असं समर्थ सुचवितात. अशा प्रकारे ज्ञान प्राप्त झालेले लोक त्या संस्थेतच नाही तर देशात परदेशात प्रसिद्ध होतात हे सांगताना समर्थ म्हणतात - जाणते करून विखरावे । नाना देसीं ॥

हा उपदेश दासबोधातील ज्या समासात केला आहे त्याला समर्थानी **'निस्पृह वर्तणूक'** असे नाव दिले आहे. अंगी निस्पृहता असल्याशिवाय वर उल्लेख केलेला उपदेश साध्य होणार नाही असे समर्थांना सांगायचे असावे.

मनुष्यबळ हे संस्थेची ऍसेट म्हणजे मालमत्ता आहे असं सांगणाऱ्या अनेक परदेशी थेअरी आपल्याला सांगण्यात येत असल्या तरी याचा समर्थ विचार आपल्याकडे चारशे वर्षांपूर्वीच करून ठेवला आहे हे या निमित्ताने लक्षात ठेवावं.


'बहुत चिंता करू नये, बहुत अन्न
खाऊ नये, बहुत निद्रा करू नये,
उन्मत्त द्रव्य सेवू नये'
- समर्थ रामदास स्वामी

१३) समर्थ गुंतवणूक सल्लागार.

शीर्षक वाचून कदाचित आश्चर्य वाटलं असेल. कारण वरवर पाहता 'समर्थ' आणि ' गुंतवणूक ' हे दोन वेगवेगळ्या टोकाचे शब्द वाटतात पण प्रत्यक्षात मात्र फायनान्स क्षेत्रातही समर्थ कसे साहाय्य करतात हे पाहुयात. सध्याच्या जगातील मनुष्याच्या आयुष्यात पैशाला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळेच फायनान्शियल मॅनेजमेंट म्हणजेच वित्त व्यवस्थापन हा आजच्या काळातील परवलीचा शब्द झाला आहे ! फायनान्सशिवाय आधुनिक जगातील मनुष्याचे पानही हलत नाही. त्यामुळे त्याविषयी मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तींना विशेष महत्व असते. मात्र फक्त आणि फक्त पैशांचे व्यवस्थापन केले की आपलं आयुष्य समृद्ध होतं असा संकुचित समज सर्वत्र आढळतो. दुसऱ्या बाजूला समर्थ मात्र संपत्ती या संज्ञेचा फार व्यापक अर्थ सांगतात आणि आयुष्यात समृद्ध व्हायचे असेल तर केवळ पैसे जमा करणे पुरेसे नाही तर सर्वांगाने समृद्ध होणे आवश्यक आहे असे सांगतात. त्यामुळे केवळ पैशामध्ये गुंतवणूक करणं एवढंच आपलं ध्येय न ठेवता आयुष्याच्या इतर ठिकाणी सुद्धा गुंतवणूक करा असं सांगून त्यासाठी सर्वप्रथम 'विद्या प्राप्त करा म्हणजे त्यापाठोपाठ लक्ष्मी आपोआप येईल' असे समर्थ सांगतात. त्यामुळेच रामरायाकडे मागणे करताना ते "विद्या वैभव दे रे राम" असं म्हणतात. विद्या हे एक प्रकारचे वैभव आहे जे कोणीही चोरू शकत नाही आणि ही विद्या

एकदा प्राप्त झाली की ज्ञान प्राप्त होते आणि त्या ज्ञानाच्या **मदतीने "उदासीनता दे रे राम"** असे म्हणण्याची बुद्धी प्राप्त होते.

एखाद्या मुरलेल्या फायनान्स टीचरप्रमाणे समर्थ आपल्याला आपल्या गुंतवणुकीचे देखील नियोजन करायला शिकवतात. अर्थात वर म्हणल्याप्रमाणे केवळ पैशातील गुंतवणूक करा असे न सांगता आयुष्यात उपयोगी पडतील असे वेगवेगळे गुंतवणूक पर्याय ते सांगतात. सर्वात पहिली गुंतणवूक श्रवणात करा असे समर्थ सांगतात. म्हणूनच त्यांनी श्रीमत दासबोधात सर्वात अधिक महत्व श्रवणाला म्हणजे लक्षपूर्वक ऐकण्याला दिले आहे. दासबोधातील श्रवणभक्ती निरूपण या समासात समर्थ सांगतात की जगातील प्रत्येक मनुष्याने आपली प्रगती करून घेण्यासाठी आणि विविध शास्त्रांमध्ये पारंगत होण्यासाठी विद्वान लोकांशी संवाद साधत राहिले पाहिजे. योग्य श्रवणासाठी गुंतवलेला वेळ आपल्याला हमखास परतावा मिळवून देतो. अर्थात श्रवण केल्यानंतर आपल्या बुद्धीचा कस लावून योग्य-अयोग्य गोष्टी शोधून पाहाव्यात हे सांगताना ते **म्हणतात उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पाहावे । खरेंखोटें निवडावें । अंतर्यामीं ॥**

आपली प्रगती साधण्यासाठी आपले कुटुंब नेटके असावे हे सांगताना समर्थ म्हणतात आधी प्रपंच करावा नेटका ! कौटुंबिक पातळीवर योग्य नियोजन केले आणि प्रपंचासाठी योग्य गुंतवणूक केली तर त्याचा फायदा नक्की होतो असे समर्थ सांगतात. या उलट

प्रपंच नेटका न केल्यास सर्वांचीच दुर्दशा होते आणि आपली **अवस्था "लेंकुरें उदंड जालीं, तों ते लक्ष्मी निघोन गेली "**अशी होते असे समर्थ सांगतात.

'प्रपंची पाहिजे सुवर्ण' हे सांगून समर्थ त्या काळातील सोन्याचं महत्व सांगतात . अर्थात हे करत असताना आपल्या संपत्तीचे नियोजन करायला पाहिजे हे देखील ते सांगतात. आपल्या खर्चांवर नियंत्रण राहिले नाही तर नाईलाजाने आपल्याला कर्ज काढावे लागते आणि कर्जाची परतफेड करणे शक्य झाले नाही तर तर त्या व्यक्तीच्या अवस्थेचे वर्णन करताना समर्थ म्हणतात - **मागें रुण ज्याचें घेतलें । त्याचें परतोन नाहीं दिल्हें । ऐसें आभाळ कोंसळलें । उद्वेगाचें ॥**

चांगले आरोग्य ही देखील एक गुंतवणूक आहे हे सांगताना समर्थ म्हणतात **'बहुत चिंता करू नये, बहुत अन्न खाऊ नये, बहुत निद्रा करू नये, उन्मत्त द्रव्य सेवू नये'**. अशा चुकीच्या सवयींचे दुष्परिणाम आपल्या आरोग्यावर दिसतात आणि आरोग्यात झालेली बिघाडी दुरुस्त करण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. म्हणूनच काही कारणाने आपल्याला एखादा आजार झाला तर त्यावर लगेच इलाज करावा. आजार असूनही औषध न घेणाऱ्या आणि पथ्य न पाळणाऱ्या व्यक्तीला ते 'मूर्ख' म्हणतात.

आपण ज्या नोकरी व्यवसायात असतो त्यासाठी योग्य वेळेची आणि ज्ञानाची गुंतवणूक करावी असे समर्थ सांगतात. **ज्या ज्याचा जो व्यापार । तेथें असावे खबर्दार । दुश्चितपणें तरी पोर । वेढा**

लावी असे सांगून समर्थ सांगतात की आपल्या नोकरी -व्यवसायात आपण खबरदार नाही राहिलो तर अगदी छोटे मुल देखील आपल्याला फसवू शकते. हे साध्य करण्यासाठी 'रिकामा जाऊ नेदी येक क्षण ' म्हणजेच एक क्षणही वाया घालवू नये असे ते सांगतात.

याशिवाय उत्तम लोकसंग्रह करण्यातील गुंतवणूक, उद्धमशीलतेतील गुंतवणूक, आळस झटकण्यातील गुंतवणूक अशा विविध विषयांवर दासबोधात सविस्तर मार्गदर्शन केले आहे. दासबोधात सांगितलेली गुंतवणूक आपण काळजीपूर्वक केली तर समर्थांचे **उत्कट भव्य तेंचि घ्यावे । मळमळीत अवघेंचि टाकावें । निस्पृहपणे विख्यात व्हावें । भूमंडळीं** हे स्वप्न सहजसाध्य होईल;


THEYS AND TRAILS
कल्याण करी
रामराया

डॉ. वीरेंद्र वसंत ताटके

यांची ई साहित्यवरील इतर पुस्तकं
क्लिक करताच उघडतील.

पु. ल. देशपांडे- मराठी साहित्यातील अढळ ताराच. अर्ध्या पाऊण शतकानंतरही त्यांच्या पुस्तकांचे गारूड काही मराठी मनावरून उतरत नाही.पण वाटतं, आज पुलं असते तर त्यांच्या त्या पात्रांनी काय काय केलं असतं? त्यांचा बेंबट्या, धोंडोपंत, नारायण, हरितात्या, रावसाहेब, गटणे सगळ्याच व्यक्ती आणि वल्लींची आज आम्हाला गरज आहे. त्यांच्या जोडीला 'असा मी असामी' मधला कविता करणारा नानू सरंजामे, बढाया मारणारा आप्पा भिंगार्डे, शंकऱ्या, प्रोफेसर ठिगळे आले तर मोठीच मजा येईल. असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठी हे खास.